संस्थापक : साने गुरुजी

# साधना

शनिवार
१४ मार्च २००९
मूल्य रु. ८/-



## तिसरी आघाडी निवडणुकीत रंग भरणार!







**: अंतरंग :** ० शरद पवारांचे राजकारण – **विवेक घोटाळे**

० राखीव मतदारसंघांची वाढ काय दर्शविते? – **संदीप मराठे**

० परिवर्तनवादी चळवळींच्या हातांत मी ओबामा दिला – **संजय आवटे**

० एका नोकरशहाचे अर्कचित्र आणि ... – **लक्ष्मीकांत देशमुख**

० उदारमतवादाचा वारसा : ऑन लिबर्टी – **सुमन ओक**

डॉ. अरुण गद्रे यांची
नवी कोरी
दमदार कादंबरी.




प्रत्येकाच्या मनात ती असते.
पण कामिनीसारख्या एखाद्या
छोट्या मुलीलाच ती दिसते.
मोठी माणसं मात्र आपापल्या विश्वात दंग असतात,
लाथा झाडत असतात,
जखमा करत असतात एकमेकांना.
कामिनीच्या लाडक्या आयुडी-बाबुडीसारखे,
आजोबांसारखे, सीमा-चारुहाससारखे.
मात्र, एखादा फारुक मेहता,
एखाद्या देशपांडे आजी मदत करतात
या सर्वांना त्यांच्या मनातल्या 'ती'चं
अस्तित्व जाणवून द्यायला.
आणि एवढं झाल्यावर कामिनी खुदखन् हसते.
आजोबांना विळखा घालत म्हणते,
'वेडी सुमिता काही खरीखुरी नसतेच मुळी!'

**वेडी सुमिता**
डॉ. अरुण गद्रे
मूल्य २६० /- + ३०/-पोस्टेज

**साधनाच्या सभासदांना मनोविकासची सर्व पुस्तके २५% सवलतीत**

खालील पत्त्यावरच
मनोविकासची
सर्व पुस्तके मिळतील.

मनोविकास प्रकाशन
३ए शक्ती टॉवर्स, ६७२नारायण पेठ,
पुणे३० फोन -०२०-६५२६२९५०
मुंबई-०२२-६४५०३२५३
मनोविकास बुक सेंटर,
आमदार निवास आवार,
चर्चगेट, मुंबई
मोबाईल-९९६७०८१५२७
Email : manovikaspublication@gmail.com

साहित्य आणि संस्कृतीला वाहिलेले
मराठीतील दमदार मासिक

# इत्यादी
मनोविकास

**आजच इत्यादीचे वर्गणीदार व्हा.**
वार्षिक वर्गणी १० मासिक अंक + दिवाळी अंक +
पोस्टेज = ३१० रु. सवलतीत २०० रु.
**संपर्क-शेजारील पत्त्यावर**

**इत्यादी मनोविकासच्या** सर्व वाचकांना
मनोविकास प्रकाशनाची सर्व पुस्तके
**२५% इतक्या भरगोस सवलत.**

# तिसरी आघाडी निवडणुकीत रंग भरणार!

पंधराव्या लोकसभेसाठीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याबरोबर आघाड्या आणि 'बिघाड्यां'चे प्रकार सुरू झाले आहेत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी; भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी; माजी प्रधानमंत्री एच.डी.देवेगौडा, चंद्रबाबू नायडू, जयललिता व डावे पक्ष यांची तिसरी आघाडी असे सर्वसाधारण चित्र उभे राहत आहे. यात भाजपच्या नेतृत्वाखालील आघाडीतून बिजू जनता दल हा प्रमुख पक्ष बाहेर पडला आहे. यामुळे भाजप आघाडीला केवळ खिंडारच पडले नाही तर लालकृष्ण अडवानी यांच्या पंतप्रधानपदाच्या स्वप्नाला सुरुंगच लागल्यासारखे झाले आहे. दुसरीकडे प्रादेशिक राजकीय पक्षांना तुच्छ लेखणाऱ्या काँग्रेस पक्षात आता चिंतेचे वातावरण निर्माण होऊ लागले आहे. कारण आता त्यांना या तिसऱ्या आघाडीशीच लढाई करावी लागेल. ही आघाडी अचानक कशी निर्माण होईल हे कोणालाही सांगता येणार नाही आणि कदाचित काँग्रेस आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस व रामविलास पास्वान यांच्यासारखे घटकपक्ष देखील या तिसऱ्या आघाडीबरोबर जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्या परिस्थितीत काँग्रेसचे पुन्हा सरकार स्थापन करण्याचे आणि येत्या काही वर्षात राहुल गांधी यांना प्रधानमंत्रीपदावर विराजमान करण्याचे स्वप्नही स्वप्नच राहू शकते. तिसऱ्या आघाडीच्या हालचाली आणि ओरिसात सत्तारूढ बिजू जनता दलाने भाजपबरोबरचे संबंध तोडून डाव्या पक्षांबरोबर हातमिळवणी करण्याची केलेली घोषणा, हे निवडणुकीनंतर निर्माण होऊ पहात असलेल्या वेगळ्या राजकीय चित्राचेच संकेत आहेत. देवेगौडा यांनी १२ मार्च रोजी तिसऱ्या आघाडीचा मेळावा घेतला आहे, त्यानंतर चित्र आणखी स्पष्ट होईल.

लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर अपेक्षित जोडतोड सुरू झालेलीच आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने सुरुवातीलाच चरणसिंग-पुत्र अजितसिंग यांच्याबरोबर पश्चिम उत्तरप्रदेशात, ओमप्रकाश चौटाला यांच्या पक्षाबरोबर हरयानात आणि आसाम गण परिषदेच्या एका गटाबरोबर आसामात हातमिळवणी करून सुरुवात तर चांगली केली. परंतु दरवेळेप्रमाणेच भाजपची सुरुवात चांगली होते, पण ती स्थिती टिकविताना पक्षाची दमछाक होऊन ऐनवेळी काहीतरी गडबड होते. तसाच प्रकार याहीवेळी झाला. अगदी सुरुवातीला शिवसेनेकडून भाजपला ब्लॅकमेल केले गेले. महाराष्ट्रात दोन्ही पक्षांची ऐतिहासिक युती टिकते की नाही अशी शंका निर्माण झाली. परंतु ती कशीबशी टिकविण्यात आल्याची आतापर्यंतची माहिती आहे. शिवसेनेच्या ब्लॅकमेलिंगमधून बाहेर पडत नाही तोच ओरिसात बिजू जनता दलाने भाजपबरोबरचे संबंध व आघाडी तोडण्याची घोषणाही करून टाकली. भाजपने चंदन मित्रा यांना जागावाटपाची बोलणी करण्यासाठी भुवनेश्वरला पाठविले; मित्रा यांनी नवीन पटनायक यांची भेट घेतली तेव्हा पटनायक यांनी 'पाच जागा पाहिजे तर घ्या अन्यथा आघाडी नाही' असे सांगितले. मित्रा हे ९ ऐवजी ११ जागा मागण्यास गेले होते, पण त्यांना भलत्याच गोष्टीस सामोरे जावे लागले. भाजप नेतृत्वाशी बोलण्याची इच्छा त्यांनी प्रदर्शित केली, परंतु पटनायक यांनी, 'त्याची गरज नाही, या जागा तुम्हाला मान्य नाहीत हे आम्हाला कळते, त्यामुळे त्यावर अधिक काही चर्चा करण्याची गरज नाही' असे सांगून भेटच संपवली. चंदन मित्रा यांना हात चोळत परतावे लागले. कंधमाल प्रकरण, ख्रिश्चनांवरील हल्ले या सर्व प्रकरणांमध्ये भाजप व संघपरिवाराने पटनायक यांना एवढे छळले होते की अखेर त्यांनी देखील आघाडी तोडली. पटनायक एवढे सज्जन की त्यांनी अधेमधे आघाडी तोडण्याचा प्रकारही केला नाही; मुकाट्याने सर्व काही हलाहल पचविले आणि लोकसभा व ओरिसा विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर आघाडी तोडली. परंतु अल्पसंख्याक विद्वेषाने पछाडलेल्या भाजप व संघपरिवाराने नवीन पटनायक यांना राज्यकारभार करताना सळो की पळो करून सोडले होते. मध्यंतरी ओरिसात सांप्रदायिक दंगे झाले त्यावेळी बजरंग दल व संघ परिवारातील अन्य संघटनांविरुद्ध कारवाईचे प्रयत्न पटनायक यांनी केले असता, भाजपने सरकार पाडण्याची धमकी देत त्यांना कारवाई करू

स्थापण्या
समता शांती
टेवुनी शुद्ध
**साधनां ।**
करिती साधना
त्यांना टेवो
उत्स्फूर्त
**साधना**


**१४ मार्च २००९**
वर्ष ६१ / अंक ३१

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक : **विनोद शिरसाट**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी **साथीदार प्रिंटर्स**, पुणे ३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स - २४४३२४०२.
E-mail : weeklysadhana@gmail.com • Website : www.sadhanatrust.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर - २४४५९६३५ / ४१.
- [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]
- मुखपृष्ठ : **शेखर गोडबोले** Mob. 9822503398 •

दिली नव्हती. अखेर पटनायक यांचीही सहनशीलता संपली व त्यांनी आघाडी तोडण्याचा निर्णय केला. कमालीची सचोटी, व्यक्तिगत फायदे-तोटे न पाहणारा स्वच्छ नेता अशी त्यांची प्रतिमा आहे. केवळ दोन नोकरांसोबत राहून अत्यंत साधे राहणीमान असलेले नवीन पटनायक लोकांच्या गळ्यातले ताईत झाले आहेत. त्यांच्या आघाडी तोडण्याचा विलक्षण फटका भाजपला बसणार आहे. पण भाजपचे अनिष्टचक्र येथेच थांबलेले नाही. भाजपचा आणखी एक प्रमुख मित्रपक्ष आणि ज्यांच्याबरोबर ते बिहारमध्ये संयुक्त सरकार चालवीत आहेत त्या संयुक्त जनता दलाच्याही (जनता दल-यु) अंगात आले आहे. मुख्यमंत्री नीतीशकुमार व संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष शरद यादव यांनी भाजपला कमी जागा सोडण्याचा पवित्रा घेतला आहे. गेल्यावेळेपेक्षाही कमी जागा देऊ केल्याने भाजपमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. थोडक्यात, भाजपच्या आघाडीला ग्रहण लागलेले आहे. निवडणुकीच्या ऐन तोंडावर त्यांचा एक प्रमुख सहकारी पक्ष त्यांना सोडून गेला आहे आणि बाकीचे सहकारी पक्ष भाजपचे लचके तोडू पहात आहेत. त्यामुळे पंतप्रधानपद आणि सरकार स्थापनेचे भाजपचे मनसुबे हे सध्यातरी अधांतरी अवस्थेत आहेत.

२९ जानेवारी रोजी काँग्रेस कार्यकारिणीची एक महत्वपूर्ण बैठक झाली आणि तीमध्ये देशपातळीवर कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर आघाडी करण्यात येणार नाही असे जाहीर करण्यात आले. संयुक्त पुरोगामी आघाडी म्हणून एकत्रित निवडणूक लढवावी अशी घटक पक्षांची मागणी त्यांनी साफ धुडकावून लावली. एवढेच नव्हे तर प्रणव मुखर्जी यांनी या भूमिकेचे समर्थन करताना 'काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे, काँग्रेसची धोरणे राष्ट्रीय स्वरुपाची आहेत, काँग्रेस पक्षाला परराष्ट्र धोरण आहे' असे सांगून प्रादेशिक पक्षांची धोरणे राष्ट्रीय नसतात असे सांगितले आणि त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर अन्य कोणा पक्षाबरोबर आघाडी करणे काँग्रेसला शक्य नाही असे प्रतिपादन केले. निवडणुकांच्या आधीच काँग्रेसने आपली अहंकारी भूमिका जाहीर करून आपल्याच सहकारी मित्रपक्षांच्या मनात साशंकता निर्माण केली. त्यानंतर लालूप्रसाद यांनी सोनिया गांधी यांची भेट घेऊन सरळसरळ 'याचा अर्थ काय' असे विचारले होते. परंतु संयुक्त पुरोगामी आघाडी कायम राहील असे सांगून त्यांची समजूत घालण्यात आली. यानंतर काँग्रेसने तृणमूल काँग्रेसबरोबर आघाडी केली. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि बिहारमध्ये लालूप्रसाद यांच्याबरोबरच्या आघाडीची म्हणजेच जागावाटपाची बोलणी सुरू आहेत. त्यामध्ये रस्सीखेच सुरू आहे. परंतु त्याचा निर्णयही लवकरच लागेल असे दिसत असले तरी काँग्रेसने उत्तर प्रदेशात मात्र समाजवादी पक्षाबरोबर जागावाटप समझोता करण्यात यश मिळविलेले नाही. दोन्ही पक्षांमध्ये परस्पर ताठरपणा कायम राहिला आणि अखेर समझोता तुटला. समाजवादी पक्षाने ७४ जागांवर उमेदवार जाहीर केले व केवळ सहा जागा काँग्रेसला सोडल्या. यामध्ये सोनिया गांधी यांच्या रायबरेली व राहुल गांधी यांच्या अमेठीचा समावेश आहे. याचा अर्थ दोन्ही पक्षांत मैत्रीपूर्ण लढती होणे अटळ झाले आहे. परंतु दुसरीकडे तिसरी आघाडी निर्माण होणे आणि लगेचच बिजू जनता दलासारखा पक्ष त्यात सामील होणे ही बाब काँग्रेसला चिंता निर्माण करणारी आहे. कारण निवडणुकीनंतर काँग्रेसचे मित्रपक्ष या तिसऱ्या आघाडीत सामील होऊ शकतात आणि मग त्या परिस्थितीत काँग्रेसला पंतप्रधानपद व सरकार या दोन्हीलाही मुकावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक राजकीय पंडितांच्या अंदाजानुसार आगामी निवडणुकीत प्रादेशिक पक्षांची कामगिरी चांगली राहील. परंतु सरकार स्थापण्याइतके संख्याबळ त्यांना त्यांच्या जिवावर मिळविणे शक्य होईल काय, हा प्रश्न आहे आणि मग काँग्रेससारख्या पक्षाने बाहेरून पाठिंबा दिल्यास ते सरकार चालेल काय, असाही प्रश्न आहे. परंतु आता लोकसभा निवडणुकीत तिसरी आघाडी रंग भरणार हे स्पष्ट झाले आहे. तिसऱ्या आघाडीच्या उदयाचे चटके दोन्ही वर्तमान आघाड्यांना बसू लागले आहेत. हळूहळू निवडणुकीपर्यंत खरे राजकीय चित्र स्पष्ट होऊ लागेल. ज्याप्रमाणे लालकृष्ण अडवानी यांचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न स्वप्नच राहण्याची शक्यता आहे, तसाच काहीसा प्रकार राहुल गांधी यांच्याबाबतही होणार नाही ना?

– **निरीक्षक**, नवी दिल्ली.



**सहवेदना...**

साप्ताहिक व संपादक आणि साधना व यदुनाथजी थत्ते यांचे अभिन्न आणि सर्वाधिक ठसठशीत नाते महाराष्ट्राच्या जनमानसावर कोरले गेले आहे. या वाटचालीत यदुनाथजींना सर्वार्थाने साथ दिली ती जान्हवीताईंनी. वृद्धापकाळाने त्यांचे ३ मार्च रोजी निधन झाले. साधना परिवाराचा आणखी एक घरगुती दुवा निखळला. जान्हवी थत्ते यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

**– ग. प्र. प्रधान व साधना परिवार**



संदीप मराठे

# राखीव मतदारसंघांची वाढ काय दर्शविते?

**लोकसभा व विधानसभेच्या राखीव मतदारसंघांमध्ये वाढ झाल्यामुळे मागास समूहांना सत्तेत पूर्वीपेक्षा अधिक वाटा मिळणे निश्चितच सुलभ झाले आहे. हे सर्व राजकीय प्रतिनिधी किंवा समूह एकत्र आल्यास वर्चस्वशाली जातीगटांना ते आव्हान ठरू शकतात. त्यांची स्वतंत्रपणे एक लॉबी तयार होऊ शकते. त्याचबरोबर या गटांच्या सोबतीला मुस्लिम समूह आल्यास चित्र आणखीणच वेगळे दिसू शकेल. मात्र पक्षीय राजकारणाच्या चौकटीत व हितसंबंधांच्या राजकारणात हे सर्व गट एकत्र येणे अशक्य वाटते. नेतृत्वाची महत्वाकांक्षा, प्रत्येकाचे स्वतंत्र असे कार्यक्रम व पाठीराखे, मित्रपक्ष, राजकीय पक्षांशी युती असे अनेक अडथळे एकत्रीकरणाच्या मार्गात प्रभावी ठरू शकतात.**

एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुका, नवीन मतदारसंघ पुनर्रचनेनुसार होणार आहेत. त्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्ष तयारीस लागले आहेत. गेल्या एक वर्षापासूनच प्रत्येक पक्ष या पुनर्रचनेचा अभ्यास करताना दिसतो आहे.

पूर्वेकडील चार राज्ये व जम्मू-काश्मीर वगळून ५१३ लोकसभा मतदारसंघ व ३७२६ राज्य विधानसभा मतदारसंघाची परिसीमन आयोगामार्फत पुनर्रचना करण्यात आली. या बदलांमुळे गेली ३० वर्षे स्थिर असलेल्या राजकारणाला काही प्रमाणात मोकळीक मिळणार आहे. पूर्वीची राजकीय समीकरणे व आघाड्यांमध्ये पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर निश्चितच बदल संभवतो, हे अलीकडच्या राजकीय घडामोडींवरून जाणवू लागले आहे. पुनर्रचनेत झालेल्या बदलांचे परिणाम पुढील ३० वर्षांच्या राजकारणावर जाणवणार आहेत.

मतदारसंघ पुनर्रचनेत भौगोलिक सीमांची मोडतोड तर झालीच, पण त्याबरोबरच आणखी महत्त्वपूर्ण बदल झाले ते म्हणजे राखीव मतदारसंघामध्ये झालेली वाढ. २००४ पर्यंत देशभरात ११० लोकसभा मतदारसंघ राखीव होते. त्यामध्ये अनुसूचित जातींसाठी ७९ व अनुसूचित जमातींसाठी ४१ मतदारसंघ राखीव होते. नवीन मतदारसंघ पुनर्रचनेत अनुसूचित जातींसाठीचे मतदारसंघ ७९ वरून ८५, तर अनुसूचित जमातींसाठीचे मतदारसंघ ४१ वरून ४५ राखीव झाले आहेत. १९७६ च्या पुनर्रचनेच्या तुलनेत नवीन पुनर्रचनेत राखीव मतदारसंघात १० ने वाढ झाली आहे.

राखीव मतदारसंघांमध्ये झालेले बदल राज्यानुसार वेगवेगळे आहेत. सर्व राज्यांमध्ये राखीव मतदारसंघ वाढलेले नसून, काही राज्यांत खुल्या मतदारसंघामध्ये वाढ झालेली आहे. (पहा तक्ता क्र. १). वाढलेल्या राखीव मतदारसंघांमुळे दलित व बिगरदलित असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. कारण लोकसभा मतदारसंघातच राखीव मतदारसंघ वाढले असे नाही, तर त्या त्या राज्यांमध्ये विधानसभेचे खुले मतदारसंघ कमी होऊन राखीव मतदारसंघ वाढलेले आहेत. (पहा तक्ता क्र. २) त्यामुळे राखीव मतदारसंघांचा मुद्दा कळीचा बनू शकतो.

**लोकसभा राखीव मतदारसंघाचा प्रवास**

१९७६ च्या मतदारसंघ पुनर्रचनेतही राखीव जागांमध्ये वाढ करण्यात आली होती. मात्र त्यावेळी ३१ वी घटनादुरुस्ती

**(तक्ता क्र. १) पुनर्रचनेनंतरचे लोकसभा राखीव मतदारसंघ**

| राज्य | सर्वसाधारण | अनु.जाती | अनु.जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|
| पंजाब | ०९ (०८) | ०४ (०३) | – | १३ |
| बिहार | ३४ (३३) | ०६ (०७) | – | ४० |
| प.बंगाल | ३० (३२) | १० (०८) | ०२ (०२) | ४२ |
| झारखंड | ०८ (०८) | ०२ (०१) | ०४ (०३) | १४ |
| छत्तीसगड | ०७ (०५) | ०१ (०२) | ०३ (०४) | ११ |
| मध्यप्रदेश | १९ (२०) | ०४ (०४) | ०६ (०५) | २९ |
| महाराष्ट्र | ३९ (४१) | ०५ (०३) | ०४ (०४) | ४८ |
| आंध्रप्रदेश | ३२ (३४) | ०७ (०६) | ०३ (०२) | ४२ |
| कर्नाटक | २१ (२४) | ०५ (०४) | ०२ (००) | २८ |
| अरुणाचल प्रदेश | ०० (०२) | ०० (०२) | ०२ (००) | ०२ |
| | | + ०६ | + ०४ | |

स्रोत : ए.के.वर्मा (EPW - 15 Mar.2008) (कंसातील आकडे १९७६ च्या पुनर्रचनेतील मतदारसंघांची संख्या दर्शवितात.)

(१९७३) करून लोकसभेची सदस्यसंख्या वाढवण्यात आली होती. (५२० वरून ५४५). साहजिकच खुल्या मतदारसंघांमध्येही त्या प्रमाणात वाढ (४०६ वरून ४२६) करण्यात आली होती. नवीन मतदारसंघ पुनर्रचनेत मात्र लोकसभेच्या एकूण सदस्यसंख्येत वाढ न करता, राखीव जागांमध्ये वाढ करण्यात आली आहे. परिणामी, खुल्या मतदारसंघांची संख्या कमी झाली आहे.

**विधानसभेचे राखीव मतदारसंघ**

राज्य विधानसभेतील राखीव मतदारसंघाचा विचार करता, २० राज्यांमध्ये बदल झालेले आहेत. १९७६ च्या पुनर्रचनेच्या तुलनेत अनुसूचित जातींच्या मतदारसंघांमध्ये ४५ ने वाढ झाली आहे. तर अनुसूचित जमातींच्या मतदारसंघामध्ये १७ ने वाढ झाली आहे. नव्याने राखीव झालेल्या मतदारसंघांमुळे खुले मतदारसंघ ६२ ने कमी झाले आहेत. (पहा तक्ता क्र. २).

राज्यवार विचार केल्यास कर्नाटकात सर्वाधिक म्हणजे १६ विधानसभा मतदारसंघ राखीव झाले आहेत. त्या खालोखाल महाराष्ट्र १४, आंध्रप्रदेश १३, प.बंगाल ८ असे बदल झाले आहेत. राज्यांप्रमाणे ही संख्या कमी-जास्त दिसून येते. त्यामुळे वर म्हटल्याप्रमाणे दलित व बिगर दलित समूहांच्या संबंधांमध्ये बदल संभवतो.

**सर्वच राजकीय पक्षांना फटका**

खुल्या जागांवरील काही पक्षांतील महत्त्वाच्या नेत्यांचे मतदारसंघ राखीव झाल्याने त्यांना नवीन मतदारसंघांचा शोध घ्यावा लागतो आहे तर काहींना घरी बसावे लागणार आहे. किंवा राज्यसभेचा पर्याय निवडावा लागणार आहे. त्यामुळे काही प्रस्थापितांना धक्का बसणार आहे.

खुल्या जागा कमी झाल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना तोटा झाला आहे. त्या त्या राज्यातील प्रस्थापित जाती-समूहांची राजकीय सत्तेची कक्षा काही प्रमाणात मर्यादित होणार आहे. जसे की महाराष्ट्रात मराठा आमदारांची संख्या कमी होऊ शकते. कर्नाटकात वोक्कालीग व लिंगायत तर आंध्र प्रदेशात रेड्डींना याचा फटका बसू शकतो. राखीव मतदारसंघ वाढल्यामुळे मागास जाती-जमातींची देवाणघेवाणीची सत्ता (बार्गेनिंग पॉवर) काही प्रमाणात विस्तृत होईल. एकंदरीत सर्वच प्रादेशिक व राष्ट्रीय पक्षांना थोडे-फार नुकसान सोसावे लागणार आहे. या बदलांमुळे दलित राजकारण करणाऱ्या पक्षांच्या महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यांच्यातील इच्छुक उमेदवारांची संख्यादेखील वाढली आहे. शिवाय, या बदलामुळे काही मतदारसंघात प्रभावी असे अनुसूचित जाती किंवा जमातींचे उमेदवार मिळू शकत नाहीत. कारण प्रस्थापित पक्षांनी आजवर कनिष्ठ जातींतील नेतृत्व पुढे येऊन दिल्याने हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**(तक्ता क्र. २) पुनर्रचनेनंतरचे विधानसभा राखीव मतदारसंघ**

| राज्य | सर्वसाधारण | अनु.जाती | अनु.जमाती | एकूण |
|---|---|---|---|---|
| हिमाचल प्रदेश | ४८ (४९) | १७ (१६) | ०३ (०३) | ६८ |
| पंजाब | ८३ (८८) | ३४ (२९) | - | ११७ |
| उत्तराखंड | ५५ (५५) | १३ (१२) | ०२ (०३) | ७० |
| दिल्ली | ५८ (५७) | १२ (१३) | - | ७० |
| राजस्थान | १४१(१४३) | ३४ (३३) | २५ (२४) | २०० |
| उत्तर प्रदेश | ३१८ (३१४) | ८५ (८९) | - | ४०३ |
| बिहार | २०३ (२०४) | ३८ (३९) | ०२ (००) | २४३ |
| सिक्कीम | १७ (१८) | ०२ (०२) | १३ (१२) | ३२ |
| त्रिपुरा | ०३ (०६) | १० (०७) | २० (२०) | ३३ |
| प.बंगाल | २१० (२१८) | ६८ (५९) | १६ (१७) | २९४ |
| झारखंड | ४९ (४४) | १० (०९) | २२ (२८) | ८१ |
| छत्तीसगड | ५१ (४४) | १० (१०) | २९ (३४) | ९० |
| मध्यप्रदेश | १४८ (१५६) | ३५ (३३) | ४७ (४१) | २३० |
| गुजरात | १४२ (१४३) | १३ (१३) | २७ (२६) | १८२ |
| आंध्रप्रदेश | २२७ (२४०) | ४८ (३९) | १९ (१५) | २९४ |
| कर्नाटक | १७३ (१८९) | ३६ (३३) | १५ (०२) | २२४ |
| तमिळनाडू | १८८ (१८९) | ४४ (४२) | ०२ (०३) | २३४ |
| ओरिसा | ९० (९१) | २४ (२२) | ३३ (३४) | १४७ |
| महाराष्ट्र | २३४ (२४८) | २९ (१८) | २५ (२२) | २८८ |
| केरळ | १२४ (१२६) | १४ (१३) | ०२ (०१) | १४० |
| | - ६२ | + ४५ | + १७ | |

**मागास घटकांना सुवर्णसंधी**

लोकसभा व विधानसभेच्या राखीव मतदारसंघांमध्ये वाढ झाल्यामुळे मागास समूहांना सत्तेत पूर्वीपेक्षा अधिक वाटा मिळणे निश्चितच सुलभ झाले आहे. हे सर्व राजकीय प्रतिनिधी किंवा समूह एकत्र आल्यास वर्चस्वशाली जातीगटांना ते आव्हान ठरू शकतात. त्यांची स्वतंत्रपणे एक लॉबी तयार होऊ शकते. त्याचबरोबर या गटांच्या सोबतीला मुस्लिम समूह आल्यास चित्र आणखीणच वेगळे दिसू शकेल. मात्र पक्षीय राजकारणाच्या चौकटीत व हितसंबंधांच्या राजकारणात हे सर्व गट एकत्र येणे अशक्य वाटते. नेतृत्वाची महत्वाकांक्षा, प्रत्येकाचे स्वतंत्र असे कार्यक्रम व पाठीराखे, मित्रपक्ष, राजकीय पक्षांशी युती असे अनेक अडथळे एकत्रीकरणाच्या मार्गात प्रभावी ठरू शकतात.

**संदीप मराठे**
msandeep63@gmail.com
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र व लोकप्रशान विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे.
Mob.: 9850169709



विवेक घोटाळे

# शरद पवारांचे राजकारण...

**'इस बार, शरद पवार!' असा नारा नाशिक अधिवेशनात देऊन राष्ट्रवादीचे नेते पवारांना पंतप्रधानपदी बसविण्यासाठी प्रचारास लागले आहेत. लोकसभेत पवारांची 'पॉवर' चालणार की मायावतींची 'माया' चालणार हे निकालानंतर स्पष्ट होईलच; पण तरुणपणापासूनच सत्तेची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या पवारांना पंतप्रधानपदाचे स्वप्न १९९१ पासूनच पडत आहे. सद्या राजकीय परिस्थितीत आपले स्वप्न पूर्ण करण्याची संधी येईल असे त्यांना वाटते आहे. काँग्रेसशी बोलणी करताना दबावतंत्राचा एक भाग म्हणून पवारांनी शिवसेनेशी जवळीक साधली असली तरी त्यामागील सत्तेची महत्त्वाकांक्षा लपून राहिलेली नाही. महाराष्ट्रातून अधिकाधिक खासदार आणि राज्याराज्यांतील मित्रपक्षांच्या संख्येवर पंतप्रधानपदाचे गणित जुळवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो; परंतु सध्याच्या राजकीय परिस्थितीत हे समीकरण जुळणे अवघडच दिसते.**

शरद पवार म्हणजे एक महत्त्वाकांक्षी नेतृत्व. महाराष्ट्राचे राजकारण स्वत:च्या ताकदीवर ते फिरवू शकतात एवढा प्रभाव त्यांचा राज्यात आहे. मुख्य काँग्रेसपासून ते जेव्हा जेव्हा वेगळे झाले तेव्हा स्वबळावर त्यांनी ५० ते ७० आमदार निवडून आणले. १९८५ मधील समाजवादी काँग्रेस व १९९९ व २००४ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे यश हे त्याचे उदाहरण. एकदा भेटलेल्या कार्यकर्त्याचे नाव लक्षात ठेवणारा आणि महाराष्ट्राची खडान्‌खडा माहिती असणारा नेता अशी प्रतिमा असणारे शरद पवार तरुणपणापासूनच सत्ताकांक्षी दिसतात. त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे १९७८ चा 'पुलोद'चा प्रयोग.

आणीबाणीनंतर १९७७ साली केंद्रात जनता पक्षाचे सरकार आले. १९७७ च्या पराभवानंतर काँग्रेस पक्षात मोठी फूट पडून इंदिरा गांधी निष्ठांची काँग्रेस (इं.) व इंदिरा विरोधकांची काँग्रेस (अर्स) असे दोन पक्ष उदयास आले. त्याचे पडसाद महाराष्ट्रातही उमटले आणि राज्यातही काँग्रेसचे विभाजन झाले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील व शरद पवार अर्सबरोबर गेले. १९७८ सालची विधानसभा निवडणूक दोन्ही काँग्रेस पक्षांनी स्वतंत्रपणे लढविली. पण कोणालाही स्पष्ट बहुमत न मिळाल्याने एकमेकांविरुद्ध निवडणुका लढविणाऱ्या दोन्ही काँग्रेस पक्षांनी वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सरकार स्थापन केले. पवारांनी वसंतदादांविरुद्ध जुलै १९८७ मध्ये बंड केले आणि ते ४४ आमदारांना बरोबर घेऊन काँग्रेस आघाडीतून बाहेर पडले. सत्ताकांक्षी पवारांनी जनता पक्षाच्या मदतीने 'पुलोद'चे सरकार स्थापन करून 'मुख्यमंत्री' बनण्याची महत्वाकांक्षा तरुणपणीच पूर्ण केली. त्यानंतर ते तीन वेळा मुख्यमंत्री झाले, पण ते काँग्रेस पक्षात येऊन. काँग्रेसपासून वेगळे राहून स्वतंत्रपणे महाराष्ट्राचे राजकारण करण्यावर मर्यादा येऊ लागल्याने आणि विरोधी गटात राहून पुन्हा सत्ताप्राप्ती शक्य नसल्याचे पाहून पवारांनी राजीव गांधींच्या कालखंडात १९८६ मध्ये समाजवादी काँग्रेसचे इंदिरा काँग्रेसमध्ये विलिनीकरण केले.

चार वेळा मुख्यमंत्रीपद उपभोगणाऱ्या पवारांना आता पंतप्रधानपदाच्या महत्त्वाकांक्षेने पछाडले आहे. तशी संधी १९९१ साली चालून आली होती. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला जे काठावरचे बहुमत मिळाले त्यात महाराष्ट्राचा मोठा वाटा होता. महाराष्ट्रात त्यावेळी काँग्रेसने ३८ जागा जिंकल्या, त्यामुळे पंतप्रधानपदावर हक्क सांगणाऱ्या काँग्रेस नेत्यांत पवारांचे नाव आघाडीवर होते, पण पी.व्ही. नरसिंहरावांनी बाजी मारली आणि पवारांना संरक्षणमंत्रीपदावर समाधान मानावे लागले. परंतु १९९३ मध्ये मुंबई बाँबस्फोटानंतर त्यांना राज्यात परतावे लागले. १९९५ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पवारांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पराभूत झाली आणि राज्यात शिवसेना-भाजप युती सत्तेवर आली. १९९८ च्या लोकसभा निवडणुकांत शिवसेना-भाजप विरोधी मतांची विभागणी टाळण्यासाठी पवारांनी रिपब्लिकन पक्षाचे गट व समाजवादी पक्षाला बरोबर घेऊन ३७ जागा जिंकल्या आणि पवार विरोधीपक्षनेते झाले. परंतु १९९९ च्या लोकसभा

निवडणुकांपूर्वी पवारांनी काँग्रेसमध्ये पुन्हा एकदा (१३ वर्षांनी) दुसरे बंड केले. निमित्त होते सोनिया गांधींच्या नेतृत्वाचे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी या जन्माने भारतीय नसल्याने त्यांना पंतप्रधानपद भूषविण्याचा नैतिक अधिकार नाही, अशी भूमिका घेत शरद पवार, पी.ए.संगमा आणि तारीक अन्वर यांनी मे १९९९ मध्ये सोनिया गांधी यांच्या विरोधात बंड केले.

खरे तर सोनियांना सक्रीय राजकारणात आणण्यात पवारांचाच मुख्य पुढाकार होता. राजीव गांधी यांच्या हत्येनंतर १९९१ मध्ये सोनिया गांधींनी पंतप्रधानपद नाकारले. १९९१ ते १९९७ पर्यंत त्या राजकारणात फारशा सक्रिय नव्हत्या, पण या कालखंडात काँग्रेसचा झपाट्याने ऱ्हास होत होता. त्यामुळे १९९८ च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पवार यांच्यासहित इतर काँग्रेसजनांच्या आग्रहावरून त्या सक्रिय राजकारणात उतरल्या. त्या पक्षाध्यक्षा झाल्या त्यावेळी विदेशीपणाचा मुद्दा का उपस्थित केला नाही, असा प्रश्न निर्माण होतो. सोनिया गांधी यांची संसदीय पक्षाच्या नेतेपदी झालेली निवड, त्यांना काँग्रेसमधून मिळणारा वाढता पाठिंबा आणि विरोधी पक्षनेत्यांपेक्षा संसदीय पक्षाच्या नेत्याला प्राप्त झालेले निर्णयप्रक्रियेतील स्थान, यामुळे विरोधीपक्षनेते असलेले पवार अस्वस्थ होते. त्यातूनच नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा असलेल्या पवारांनी सोनिया गांधीविरुद्ध बंड केले आणि राष्ट्रवादी काँग्रेस उदयास आली. पवारांनी काँग्रेसविरोधात जे दोन्ही बंड केले (१९७८ व १९९९) त्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे श्रीमंत मराठा वर्ग व शुगर लॉबी त्यांच्यामागे उभी राहिली. त्याआधारेच ते आपले राजकारण पुढे रेटू शकले. मात्र काँग्रेसविरोधात बंड करूनही त्यांना काँग्रेसशी जुळवून घ्यावे लागले. १९९९ आणि २००४ च्या निवडणुकांनंतरच्या राजकीय परिस्थितीतून राष्ट्रवादीला काँग्रेसशी आघाडी करून सत्तेत राहता आले. आता २००९ च्या लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा पुन्हा पुढे आली आहे. त्याची व्यूहरचना म्हणून त्यांनी दबावतंत्राचे राजकारण सुरू केलेले दिसते.

### पवारांची खेळी

पवारांच्या राजकारणास राज ठाकरेंनी 'धोकायंत्र' असे संबोधले आहे. या धोकायंत्रामुळे म्हणजेच राष्ट्रवादी आणि शिवसेनेतील वाढत्या जवळिकीमुळे काँग्रेस आणि भाजपात मात्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. पवारांच्या या धोकायंत्रामागे सौदेबाजीची व्यूहरचना दिसते. महाराष्ट्रात काँग्रेसकडून जागा वाढवून घेण्यासाठी राष्ट्रवादीने शिवसेनेबरोबर युती करण्याची चर्चा पसरवली. या सौदेबाजीतून राष्ट्रवादीला दोन-तीन जागा वाढून मिळतीलही. शिवाय विधानसभेसाठी अधिक जागा व मुख्यमंत्रीपद अडीच वर्षे पदरात पाडून घेण्याची ती व्यूहरचना दिसते. यात काँग्रेसने अधिक ताठर भूमिका घेऊन राष्ट्रवादीच्या मागण्या मान्य केल्या नाहीत तर राष्ट्रवादीने शिवसेना हा एक पर्याय ठेवला आहे. शिवाय यातून भाजप-शिवसेना युतीत गोंधळ निर्माण करण्याचा त्यांचा हेतू दिसतो. त्यांच्यात अविश्वासाचे वातावरण निर्माण होऊन त्याचा फायदा दोन्ही काँग्रेसला मिळू शकतो. हे करतानाच पवार रिपब्लिकन पक्ष व समाजवादी पार्टीला बरोबर घेण्याची भूमिका घेताना दिसतात. त्यातून मतविभागणी टाळली जाऊ शकते.

**शरद पवारांच्या समाजवादी काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची लोकसभा निवडणुकीतील कामगिरी**

| | लोकसभा निवडणूक | प्राप्त जागा | प्राप्त मते |
|---|---|---|---|
| काँग्रेस (एस) | १९८० | ०१ | ११.८ |
| काँग्रेस (एस) | १९८४ | ०२ | १२.१ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | १९९९ | ६ | २१.६ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | २००४ | ९ | १८.६ |

शिवसेनेनेही पवारांच्या पंतप्रधानपदास पाठिंबा दिला आहे. शिवसेनेमध्ये एक गट राष्ट्रवादीबरोबर युती करण्याच्या बाजूने आहे. कारण भाजपाबरोबर जाऊन महाराष्ट्रात पुन्हा सत्ता प्राप्त करणे शक्य नसल्याने, राष्ट्रवादीबरोबर युती करून सत्ता मिळवण्याच्या बाजूचा आहे. राष्ट्रवादीची सेनेबरोबर युती झाली नाही तरी निवडणुकीनंतर पवारांना संधी आलीच तर मराठीच्या मुद्यावर सेना पवारांना पाठिंबा देऊ शकते. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत सेनेने भाजपच्या उमेदवारास पाठिंबा न देता काँग्रेसच्या प्रतिभाताई पाटील या महाराष्ट्रीयन असल्याने त्यांना पाठिंबा दिला होता.

एकीकडे काँग्रेसबरोबर दबावतंत्र वापरून अधिक जागा मिळवायच्या, दुसरीकडे सेनेशी सख्य राखायचे आणि महाराष्ट्रातून जास्तीत जास्त खासदारांचा पाठिंबा मिळवायचा आणि तिसरीकडे राज्याराज्यांतील प्रादेशिक पक्षांशी मैत्री करून पंतप्रधानपदावर दावा करायचा अशी त्यांची खेळी आहे. सध्याच्या राजकीय परिस्थितीत काँग्रेस किंवा भाजप यांना स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळे तिसरी आघाडी, काँग्रेस आघाडी व भाजप आघाडीतील काही प्रादेशिक पक्षांशी पवार मैत्रीपूर्ण संबंध ठेवून आहेत. परंतु सर्व प्रादेशिक पक्षांना मिळून २७१ चा आकडा गाठणे अशक्य आहे. त्यामुळे पवारांचे गणित चुकण्याचीच शक्यता अधिक दिसते.

### मराठा आरक्षणाचे राजकारण

निवडणुकांच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा प्रश्न पेटलेला दिसतो. पवारांनी मराठा समाजाला नोकऱ्या व शैक्षणिक क्षेत्रांतील आरक्षणाचे समर्थन केले आहे. त्याचबरोबर 'त्यांना राजकीय क्षेत्रात आरक्षण नको' असे म्हटले आहे. खरे तर या प्रश्नात राज्यकर्ते तेच आणि मागणी करणारे तेच अशी अवस्था

झाली आहे. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था ते विधानसभा पातळीपर्यंत संख्येने अधिक असलेल्या मराठा समाजाचेच वर्चस्व आहे. राज्यातील शंभराहून अधिक विधानसभा मतदारसंघात सातत्याने मराठा उमेदवारच निवडून येताना दिसतात. (जणू ते मतदारसंघ मराठा जातीसाठीच आरक्षित आहेत.) असे असताना 'मराठ्यांना राजकीय आरक्षण नको' या मुद्याला काहीच अर्थ नाही. राष्ट्रवादीने विनायक मेटेंना पुढे करून मराठा संघटनांच्या समन्वय समितीद्वारे ही मागणी पुढे रेटली, हे आता उघड झाले आहे.

यामागे शिवसेनेचा मराठा पाठीराखा कमी करून तो स्वत:कडे वळवणे अशी राष्ट्रवादीची खेळी दिसते. राष्ट्रवादीला पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रात मराठ्यांचा पाठिंबा आहे, पण मराठवाडा, विदर्भ आणि कोकण या विभागात मराठ्यांचा पाठिंबा शिवसेनेला अधिक मिळताना दिसतो. १९९० नंतर या विभागातील गरीब, बेकार मराठा समाज प्रस्थापित काँग्रेसपासून आणि प्रस्थापित श्रीमंत मराठ्यांपासून दूर जाऊन शिवसेनेचा पाठीराखा बनला. शैक्षणिक व नोकऱ्यातील आरक्षणाच्या मुद्यातून शिवसेनेकडील हा पाठीराखा वर्ग राष्ट्रवादीकडे वळविण्याचा आणि त्याआधारे या विभागात पक्षविस्तार करण्याचा हेतू दिसतो. पवारांची ही खेळी यशस्वी झाली तर त्याचा फटका सेनेला बसू शकतो. परंतु या खेळीतून राष्ट्रवादीचा ओबीसी मतदार दुरावण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

**राष्ट्रवादी काँग्रेस– प्रादेशिक पक्षच!**

राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्राबाहेर इतर काही राज्यांत चार-दोन आमदार असले तरी आणि राष्ट्रीय पक्षाची मान्यता असली तरी राष्ट्रवादी हा अजूनही एक प्रादेशिक पक्षच आहे. महाराष्ट्रातही या पक्षाचा विस्तार संपूर्ण राज्यभर नाही. पश्चिम महाराष्ट्र हा राष्ट्रवादीचा गड आहे; उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पक्ष प्रभावी आहे; पण मुंबई-कोकण व विदर्भात पक्षाचा प्रभावी कमी दिसतो. शिवाय सामाजिक पाठीराख्यांचा विचार करता मराठा समाज हा पक्षाचा प्रमुख पाठीराखा. काही अपवादात्मक ठिकाणी ओबीसी, आदिवासी आणि मुस्लिम समाज पक्षाबरोबर आहे. त्यामुळे राष्ट्रवादीसमोर राज्यभर पक्ष विस्तारण्याचे आणि मराठेतर समाजघटकांचा पाठिंबा मिळवण्याचे आव्हान आहे. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी 'इस बार, शरद पवार' असा नारा दिला असला तरी हा प्रश्न अंतर्गत गटबाजीने पोखरलेला आहे. साहेबांना पंतप्रधानपदी बसवण्यासाठी राष्ट्रवादीतील नेते एकत्रित येतील काय, हा प्रश्न आहेच!

**...तर आश्चर्य वाटू नये**

भविष्यात सत्तेसाठी शरद पवार हिंदुत्ववादी पक्षांबरोबर गेले तर आश्चर्य वाटू नये. तसा पवारांच्या सत्ताकांक्षी राजकारणाचा इतिहास आहे. १९८० ते १९८६ या कालखंडात पवारांनी मुख्य काँग्रेस पक्षापासून वेगळे राहून आणि काँग्रेसविरोधी पक्षांचे नेतृत्व स्वत:कडे घेऊन महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. या कालखंडात जनता पक्ष, शेकापसह पवारांनी भाजपशी जुळवून घेण्याची भूमिका घेतलेली दिसते. उदाहरणार्थ– मार्च १९८२ मध्ये राज्यसभा व विधानपरिषदेवर निवडून देण्याच्या जागांसंबंधी भाजप व पवारांची समाजवादी काँग्रेस यांनी परस्पर सहकार्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार राज्यसभेसाठी समाजवादी काँग्रेसच्या सुरेश कलमाडी यांना भाजपने पाठिंबा दिला होता, तर विधान परिषद निवडणुकीत समाजवादी काँग्रेसने भाजप उमेदवारास पाठिंबा दिला. दुसरे उदाहरण म्हणजे औद्योगिक क्षेत्रांत गुंडगिरी करणाऱ्या शिवसेनेसारख्या संघटनांना सरकारने आळा घालावा, अशी भूमिका घेणारे पवार (एप्रिल १९८१) कालांतराने म्हणजे शिवसेनेने काँग्रेसशी फारकत घेतल्यानंतर शिवसेनेच्या जवळ गेलेले दिसतात. म्हणजेच या कालखंडात काँग्रेस विरोधी असलेला कोणताही पक्ष त्यांच्यासाठी अस्पृश्य नव्हता. २००४ साली राष्ट्रवादी भाजपशी युती करणार अशी चर्चा होती; पण केंद्रातील राजकारण भाजपविरोधी असल्याने आणि राज्यातही भाजपची ताकद मर्यादित असल्याने चर्चा पुढे सरकू शकली नाही. आज आघाड्यांच्या राजकारणात विचारप्रणालीचा मुद्दा दुय्यम ठरला असून सत्तेस अधिक महत्त्व आलेले दिसते. काँग्रेस व राष्ट्रवादी सत्तेत असले तरी त्यांनी सतत एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. स्थानिक स्वराज्य संस्थांत काँग्रेसला सत्तेपासून रोखण्यासाठी राष्ट्रवादीने काही ठिकाणी सेना-भाजपशी युती केलेली दिसते. तर काँग्रेसनेही राष्ट्रवादीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी सेना-भाजपची मदत घेतल्याची अनेक उदाहरणे आहेत.

हे सर्व वास्तव असले तरी पवार हिंदुत्ववादी पक्षाबरोबर उघडपणे आघाडी करणे शक्य नाही. भाजप आणि शिवसेनेतील युतीचा मुख्य आधार हा हिंदुत्वाचा मुद्दा आहे. तसा आधार राष्ट्रवादी आणि शिवसेनेत नाही. पवारांनी हिंदुत्ववादी पक्षांशी युती केल्यास ते हिंदुत्ववादाचा स्वीकार करणार का, हा प्रश्न आहे. पवारांची महाराष्ट्रात एक बहुजनवादी, धर्मनिरपेक्ष नेता म्हणून प्रतिमा आहे. यशवंतराव चव्हाणांचे वारस म्हणून त्यांनी सामाजिक न्यायाचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. महिला, मुस्लिम, दलित आणि ओबीसी संदर्भातील त्यांची धोरणे महत्त्वपूर्ण ठरतात. त्यातून त्यांची जी बहुजनवादी प्रतिमा निर्माण झाली आहे, ती प्रतिमा जपण्यासाठी ते उघडपणे हिंदुत्ववादी पक्षाबरोबर जाणे टाळतील.

---

**विवेक घोटाळे**
राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७.
Mob. : 9822578737





लक्ष्मीकांत देशमुख

।। अध्याय चौथा ।।

# एका नोकरशहाचे अर्कचित्र आणि आजच्या काळातील वास्तवता

भारतीय ब्युरोक्रसीने भारतातील लोकशाही जिवंत ठेवली आहे, हे आज सारे जग मान्य करीत आहे. कारण निवडणूक आयोगाचे आयुक्त हे वरिष्ठ अनुभवी प्रशासकीय अधिकारीच असतात. निष्पक्ष व काटेकोर निवडणुका घेऊन जनतेचे खरेखुरे मानस प्रतिबिंबित होणारे निकाल येणे व सत्तापरिवर्तन होणे, हे भारतात अलीकडे वारंवार घडत आहे.

मार्क्स व बेवरच्या नजरेतून आपण मागील अध्यायात नोकरशाहीच्या जन्माची कहाणी सिद्धांतरूपाने पाहिली. त्यानंतर या संदर्भात बरेच काम एफ.एम.मार्क्स, मायकेल क्रोझिअर व अनेक अमेरिकन शास्त्रज्ञांनी केले आहे, ते आपण संक्षेपाने पाहणार आहोत. त्यानंतर या तात्त्विक विवेचनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय प्रशासनाचा नोकरशाहीच्या अंगाने इतिहास अभ्यासणार आहोत. तो इतिहास वैदिक काळ ते ब्रिटिश काळापर्यंतचा असून, त्यात कौटिलीय अर्थशास्त्राने केलेले नोकरशाहीचे विवेचन, मुघल काळातील प्रशासन व्यवस्था (खास करून महसूल व्यवस्था) यांचेही धावते व संक्षेपाने विवेचन करणार आहोत.

पण आज या अध्यायात मला एका नमुनेदार ब्युरोक्रॅटचे अर्कचित्र प्रस्तुत करायचे आहे. कारण वेबरच्या मते ब्युरोक्रॅसी ही कितीही विवेकनिष्ठ व कायद्यावर आधारित संघटना- खास करून शासनाचा कारभार चालवणारी आदर्श व्यवस्था- असली तरी ती अनेक अवगुण, दोष व खास करून भ्रष्टाचारामुळे व जनतेशी नाळ तोडलेली असल्यामुळे बदनाम झाली आहे. ती हस्तिदंती मनोऱ्यात कशी वावरत असते व आत्मकेंद्रित कारभार करीत असते याचे (कॅनडाचे प्रसिद्ध प्रशासकीय अधिकारी ह्युग किनलेसाईड यांनी) एक सुरेख पण काहीशा अतिशयोक्ती पूर्ण व्यंगशैलीत अर्कचित्र काढलेले आहे. हे अर्कचित्र मी त्याचा भावानुवाद करून व त्यात माझी काही भर घालून पेश करणार आहे आणि त्यानंतर आजच्या काळातली बदलती वास्तवता दाखवणार आहे.

**नोकरशहाचे अर्कचित्र**

''हा नीटनेटका फॉर्मल पोषाख केलेला अधिकारी आपल्या कार्यालयात सकाळी नऊ ते साडेदहा या वेळेत येतो. त्याची वेळ ही कनिष्ठ अधिकाऱ्यांच्या नंतरची व वरिष्ठांच्या आधीची अशी बारकाईने निरीक्षण करून निवडलेली असते. ती वेळ त्याच्या अधिकारश्रेणी व पगाराच्या निकषावरून त्याने विचारपूर्वक ठरवलेली असते.

तो दिवसभर टपाल व फाईली पाहतो आणि असंख्य पत्रे लिहितो. पण त्याचा उद्देश प्रामुख्याने निर्णय देण्यापेक्षा माहिती मागविणे, आलेल्या माहितीतील त्रुटी काढणे, कायद्याचा कीस पाडणे व निर्णय इतरांवर ढकलण्यासाठी असतो. ही असंख्य पत्रे व नोट्स लिहूनही काहीच निर्णय न घेण्याची कला त्याने वर्षानुवर्षे अभ्यास करून आत्मसात केलेली असते; तिला कलेचे व त्याहीपेक्षा जादा शास्त्राचे रूप दिलेले असते. तो दररोज मिटींग्ज घेतो, त्याचे इतिवृत्त करण्यात बराच वेळही खर्च करतो, पण अंतिम निष्कर्ष काही काढला जात नाही. तो प्रत्येक निर्णय पुढे पुढे ढकलतो व परिस्थिती बदलण्याची या आशेवर वाट पाहतो की, त्याला तो निर्णय घ्यावाच लागू नये.

(जाता जाता : माजी पंतप्रधान नरसिंहरावांची येथे आठवण येते. त्यांच्या संदर्भात "Not to take decision is also a decision" ही काहीशी कठोर टीका आठवते. तूर्तास एवढेच पुरे.)

तो दिवसभर ऑफिसात काम करताना वरिष्ठांशी नम्र आणि कनिष्ठांबाबत कठोर व असहिष्णू

असतो. (महसूल खात्यात अशा अधिकाऱ्यांना 'मुकादम' अधिकारी असे उपहासाने म्हटले जाते. वरिष्ठांना 'मुका' (kiss) व कनिष्ठांना 'दम' म्हणजे मुकादम.)

तो इतर अधिकाऱ्यांकडे सदैव धोकादायक शत्रू वा प्रतिस्पर्धी म्हणून पाहतो. जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी तो ऐकून घेतो, त्याच्या मते ती त्याची उदारशीलता व सौजन्य असते. सामान्य जनांच्या तक्रारी व प्रसंगी अधिकाऱ्यास जाब विचारणे ही प्रवृत्ती म्हणजे अतिलोकशाहीचा दुर्दैवी परिणाम आहे, असे त्याला वाटते. त्यांची कामे करणे आवश्यक असले तरी त्यामध्ये सतत लक्ष देणे व उत्साह दाखवणे हे खऱ्या नोकरशहाला शोभत नाही, असे त्यांचे मनोमन ठाम मत असते. फक्त लोकशाही व्यवस्थेत त्याला ते व्यक्त करता येत नाही एवढेच!

तो मग कारमधून सायरन वाजवत दुपारच्या भोजनाला घरी जातो. भोजनाचा अवधी अर्धा तास असतो, पण हा नियम कनिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी. तो स्वत: सर्वसाधारणपणे तास-दोन तास लंचसाठी घेतो.

त्याच्या जेवणानंतरच्या दुपारी व संध्याकाळी कर्मचारी पावणेसहाच्या आधी घरी जाऊ नयेत यासाठी तो त्यांना विविध कामात (नोटस् बनवणे, स्टेटमेंट तयार करणे, त्याने केलेल्या दौऱ्याची डायरी लिहून काढणे अशा) गुंतवतो. पण तो वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे व त्याने वरीलप्रमाणे दिवसभर मेंदूचा भुगा करणारे अतिप्रचंड बौद्धिक काम केल्यामुळे त्याचा मेंदू शिणलेला असतो. क्वचितप्रसंगी त्याचे डोकेही दुखत असते, म्हणून तो त्याला वाट्टेल तेव्हा, प्रसंगी पावणेसहाच्या आधीही कार्यालय सोडतो. ती त्याच्या अधिकारकक्षेतील बाब आहे व त्याबाबत त्याला कुणीही जाब विचारू शकत नाही अशी त्याची समजूत असते. वाटेत थांबून डोकेदुखी वा अन्य नोकरशहाला शोभणाऱ्या रक्तदाब, वाढते वजन, हृदयविकार, मानसिक ताणतणाव आदींची औषधे घेऊन तो हाशहुश करीत घरी परततो.

दिवसभरात आपण किती काम केले व कनिष्ठ कर्मचारी कसे कामचुकार, अप्रामाणिक व सुमार बुद्धीचे आहेत हे रसपूर्णतेने घरी बायका-मुलांना सांगत तो रात्रीचे भोजन घेतो. आपण आहोत म्हणून ऑफिस जागेवर आहे, हे अभिमानाने सांगताना आपले समकक्ष अधिकारी कसे वशिल्याचे तट्टू म्हणून लागले आहेत व कसे सुमार दर्जाचे आहेत हे सांगायला तो कधीच विसरत नाही. शासनास आपल्यासारख्या गुणी व परिश्रमी अधिकाऱ्यांची पर्वा नाही, असे विषादपूर्णतेनं सांगत उदास नि:श्वास टाकत भोजन संपवतो व झोपी जातो.'

०

मला खात्री आहे हे अर्कचित्र वाचताना अनेक जाणकार वाचकांना त्यांच्या माहितीतील नोकरशहा आठवतील व ते खुदकन् हसतील. हे 'अर्कचित्र' आहे म्हणून त्यात अतिशयोक्ती जरूर आहे, पण त्याला वास्तवाचा आधार नाही असे ठामपणे कुणी नोकरशहा म्हणू शकेल? सामान्य नागरिकांनाही हे अर्कचित्र वास्तव वाटेल. कारण त्याला आमच्यातले अनेक नोकरशहा जबाबदार आहेत. पण गंमत अशी आहे की, नोकरशहाचं हे अर्कचित्रातलं वर्णन अनेक कनिष्ठ कर्मचारी व बरेच नागरिकही कौतुकानं करत म्हणतात, 'काय राजा माणूस (रॉयल) आहे.' त्यामागे आदिकाळापासून रूजलेला व ब्रिटिश काळात विशेषत्वानं दृढमूल झालेला 'मायबाप सरकारचा' सिद्धांत आहे. नोकरशहा- भारतीय संदर्भात कलेक्टर, तहसिलदार, फौजदार- हे सरकारचे प्रतीक आहेत आणि 'Government can not do any wrong' या उक्तीवर आजही अज्ञानी जनता विश्वास ठेवते. म्हणून तो नोकरशहाचं हे अर्कचित्रही कौतुकानं घेईल.

**मी सांगलीत जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असताना वाळवा तालुक्यात माझ्या हाताखाली काम करणारा दीपक चव्हाण हा गटविकास अधिकारी एका पुराने वेढलेल्या गावात रात्री मुक्कामाला थांबून लोकांना धीर देत होता व 'काही होणार नाही, प्रसंगी तुमच्याबरोबर मीही मरेन' असा दिलासा देत होता. केवढी ही बांधिलकी व जनतेशी समरस होण्याची वृत्ती!**

माझ्या सुरुवातीच्या प्रशासकीय जीवनातला एक अनुभव सांगतो. तेव्हा मी भूम (जि.उस्मानाबाद) येथे प्रांताधिकारी होतो. आमच्या भागातील काही माणसांना सूरजकुंड (हरियाना) येथे दगडांच्या खाणीत वेठबिगाराचे जिणे जगावे लागत होते. त्यांनी मला त्याबाबत पत्र लिहून कळवले म्हणून मी तिथे गेलो. दगडांच्या दहा-बारा खाणीत फिरून उस्मानाबाद जिल्ह्यातील सुमारे पाऊणशे वेठबिगार कुटुंबे शोधली व त्यांची सुटका केली. परतीच्या दिवशी दुपारी तीन वाजता तेथील कलेक्टरला भेटायला गेलो तेव्हा त्यांच्या पी.ए. व शिपायाने सांगितले. 'डी.एम.साब लंच के बाद ऑफिस नही आते. बंगलेसेही काम करते हैं.' हे सांगताना त्यांच्या स्वरात 'हमारे डी.एम.साब कितने रॉयल है' असाच सूर होता. तेव्हा तो मला मनस्वी फारच खटकला होता. पण नंतर असे अनेक अनुभव येत गेले. एक कलेक्टर कार्यालयात फक्त मीटिंग घ्यायला किंवा मंत्री आले तर यायचे. इतर वेळी अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागांच्या फाईली घेऊन त्यांच्या घरी जाऊन सह्या आणाव्यात, असा त्यांचा अलिखित नियम होता. अर्थात त्यावेळी महाराष्ट्र हा एक अप्रगत व सरंजामी युगात वावरणारा भाग असल्याने त्यांनी आपली कारकीर्द लोकांचा रोष न होता पूर्ण केली. पण आज चित्र खूप बदलले आहे. जनता जागृत व आक्रमक झाली आहे. 'नॉन परफॉर्मिंग ब्युरोक्रॅट' वर ती टीका करते, मोर्चे काढते व त्यांना सळो की पळो करून सोडते. हे माझ्या मते आशादायक चित्र आहे. कारण आम्ही नोकरशहा जनतेचे सेवक आहोत. त्यांनी दिलेल्या करातून पगार घेतो, म्हणून त्यांची कामे त्यांच्या आकांक्षांनुरूप करणे हे आमचे आद्य व परमकर्तव्य आहे. विशेष म्हणजे अलीकडच्या काळात ही जाण नोकरशाहीला मोठ्या प्रमाणात झाली आहे. आज यु.पी.एस.सी.च्या जवळपास निर्दोष

परीक्षेमुळे तळागाळातले लोक आय.ए.एस. व आय.पी.एस. होत आहेत. मागे 'द विक'मध्ये 'The changing face of bureaucracy' नावाची सुरेख कव्हरस्टोरी (एका वर्षात उत्तीर्ण होणाऱ्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या परिस्थितीचा मागोवा घेत बदलत्या प्रशासनाचे रूप दर्शविणारी) प्रसिद्ध झाली होती. त्यात ग्रामीण भागातून आलेले, मातृभाषेत शिकलेले व गरीब कुटुंबातून आलेले बहुसंख्य अधिकारी होते. त्यांची समाजाशी व गावांशी नाळ शाबूत आहे. त्यामुळे ते बरेचसे 'रिस्पॉन्सिव्ह' व 'जबाबदेही' झाले आहेत. अशा अधिकाऱ्यांनी अनेक प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या आहेत. अनेकांनी नगर प्रशासन, शिक्षण, आरोग्य इत्यादी क्षेत्रांत कामाचे नवे मापदंड निर्माण केले आहेत. कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांतील सर्व गावे या एका वर्षात पूर्णत: हागणदारीमुक्त व १००% शौचालययुक्त होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामागे असंख्य कमिटेड अधिकारी आहेत. मी स्वत: 'जनतेशी बांधील असणारी नोकरशाही असते' या तत्त्वावर विश्वास ठेवून अकोल्यामध्ये भारतातील पहिली बीओटी (बससेवा) तीही नफ्यातली सुरू केली. बालमजुरांसाठी शांता सिंन्हा यांनी वाखाणलेला 'नवजीवन प्रकल्प' सुरू केला. (त्यावर काही वर्षांपूर्वी 'साधना'मध्ये श्रीनिवास कुलकर्णी यांनी लेखही लिहिला होता.) सुरेश खोपडे यांचे 'भिवंडी दंगल' हे पुस्तक त्यांच्या चाकोरीबाहेरच्या कामाचे दर्शन घडवते. 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी राबवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न हलका केला आहे.

भारतीय ब्युरोक्रसीने भारतातील लोकशाही जिवंत ठेवली आहे, हे आज सारे जग मान्य करते. कारण निवडणूक आयोगाचे आयुक्त हे वरिष्ठ अनुभवी प्रशासकीय अधिकारीच असतात. निष्पक्ष व काटेकोर निवडणुका घेऊन जनतेचे खरेखुरे मानस प्रतिबिंबित होणारे निकाल येणे व सत्तापरिवर्तन होणे, हे भारतात अलीकडे वारंवार घडत आहे. या निवडणुका घेणारे निवडणूक निर्णय अधिकारी हे जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी या स्तरावरचे असतात. नुकतीच काश्मीरमध्ये निवडणूक झाली व ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोकांनी मतदान करून आपला कौल दिला. तो कौल फुटीरवादी हुरियत नेत्यांना दिलेली सणसणीत चपराक होती, आणि निवडणूक प्रक्रियेवरचा प्रकट झालेला विश्वासही होता. तो विश्वास नोकरशाहीने निष्पक्ष वागून व आदर्श निवडणूक आचारसंहितेची बऱ्याचअंशी अंमलबजावणी करून मिळवलेला होता. हे कोणी निवडणूक विश्लेषकाने लिहिले नाही ही खेदाची बाब आहे, पण ती वस्तुस्थिती आहे व निवडणूकप्रसंगी हे प्रत्ययास येते हे खरे.

**नांदेडला आलेल्या १९८३ च्या महापुराच्या वेळी, प्रशासनाने एका रात्रीतून सुमारे २० टन अन्नपदार्थ शिजवून, त्यांची दहा हजार पाकिटे तयार करून दुसऱ्या दिवशी सकाळी (केंद्रीय मंत्र्यांच्या हवाई पाहणीच्यावेळी) पुराने वेढलेल्या व संपर्क तुटलेल्या गावात टाकली होती. त्यावर एका नेत्याने मिश्किल टिप्पणी केली. 'देशमुख साहेबांनी तलाठी ते तहसिलदार या सर्वांना एका रात्रीपुरते आचारी बनवून त्यांनाही पोळ्या लाटायला लावलं. हे दृश्य अद्‌भुत होतं!'**

हीच बाब महापूर व इतर आपत्ती व्यवस्थापनाची आहे. अतिवृष्टी व धरणाचे पाणी सोडणे यामुळे अलीकडच्या काळात महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांत महापूर आले होते. त्याप्रसंगी तातडीने लोकांना सुरक्षित स्थळी हलवून त्यांचे जीव वाचवणे, त्यांना मदतवाटप युद्धपातळीवर करणे, त्यांना पिण्याचे शुद्ध पाणी व औषधे पुरवणे व जलदगतीने त्यांचे पुनर्वसन करणे ही कामे जिल्हा व महसूल प्रशासनाने करून जनतेचा दुवा मिळवला आहे. मी सांगलीत जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असताना वाळवा तालुक्यात माझ्या हाताखाली काम करणारा दीपक चव्हाण हा गटविकास अधिकारी एका पुराने वेढलेल्या गावात रात्री मुक्कामाला थांबून लोकांना धीर देत होता व 'काही होणार नाही, प्रसंगी तुमच्याबरोबर मीही मरेन' असा दिलासा देत होता. केवढी ही बांधिलकी व जनतेशी समरस होण्याची वृत्ती! किल्लारी–उमरगा भूकंपाच्यावेळी तेथील जिल्हा प्रशासनाने जे काम केले त्याला तोड नाही. माझा अनुभव सांगावयाचा झाला तर नांदेडला आलेल्या १९८३ च्या महापुराच्या वेळी, प्रशासनाने एका रात्रीतून सुमारे २० टन अन्नपदार्थ शिजवून, त्यांची दहा हजार पाकिटे तयार करून दुसऱ्या दिवशी सकाळी (केंद्रीय मंत्र्यांच्या हवाई पाहणीच्यावेळी) पुराने वेढलेल्या व संपर्क तुटलेल्या गावात टाकली होती. त्यावर एका नेत्याने मिश्किल टिप्पणी केली. 'देशमुख साहेबांनी तलाठी ते तहसिलदार या सर्वांना एका रात्रीपुरते आचारी बनवून त्यांनाही पोळ्या लाटायला लावलं; हे दृश्य अद्‌भुत होतं!'

या अध्यायाचा समारोप करताना मला हेच नमूद करायचे आहे की, ब्युरोक्रॅटचे वर रेखाटलेले अर्कचित्र आता बऱ्यापैकी अप्रस्तुत होत चालले आहे व पुन्हा एकदा आमची वाटचाल मॅक्स वेबरच्या 'आयडियल ब्युरोक्रसी'कडे काही प्रमाणात का होईना सुरू झाली आहे पण शंभर टक्के आदर्श ब्युरोक्रसी कधीच अस्तित्वात येणार नाही, कारण मानवी दुर्बलता व विकार कधी संपत नाहीत. तरीही अलीकडे मोठ्या प्रमाणात चाकोरीबाहेरचे काम करण्याची तयारी असलेले व त्यासाठी धडपड करणारे अधिकारी पाहिले की वाटते, 'अजूनही पेला रिकामा झालेला नाहीये, उलट तो थोडा अधिक भरलेला आहे.'

*(गेली २५ वर्षे प्रशासकीय सेवेत असलेले लेखक, सध्या कोल्हापूरचे जिल्हाधिकारी आहेत.)*

---

**लक्ष्मीकांत देशमुख**
प्लॅट नंबर. १, शामसुंदर सोसायटी, सॅलिसबरी पार्क, पुणे ४११०३७.
Email : laxmikant05@yahoo.co.in
Mob.: 9325297509



संजय आवटे

# परिवर्तनवादी चळवळींच्या हातात मी ओबामा दिला!




**जानेवारी २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'बराक ओबामा : बदलत्या जगाचा सक्सेस पासवर्ड' या मराठी पुस्तकाच्या अवघ्या दोन महिन्यांत बारा आवृत्त्या निघाल्या. त्या निमित्ताने, या पुस्तकाचे लेखक संजय आवटे यांची पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्राचा विद्यार्थी केदार देशमुख याने घेतलेली मुलाखत...**

◥ **बराक ओबामांवर पुस्तक लिहावे, असे का वाटले?**

◤ आज अनेकांना असे वाटते की, फारच नियोजनबद्ध पद्धतीने हा विषय मी निवडला. काहींनी तर माझ्या चलाखीचेही कौतुक केले! प्रत्यक्षात, एका अत्यंत उत्कट क्षणी हे पुस्तक लिहायला मी सुरुवात केली... आणि सहा दिवस, सहा रात्री सलगपणे ते लिहीत होतो. निव्वळ झपाटलेपणाशिवाय दुसरी कोणतीही प्रेरणा त्यामागे नव्हती. गेल्या काही वर्षांपासून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास मी करतोय. त्यामुळे अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीकडे लक्ष होतेच. डेमोक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी बराक ओबामा आणि हिलरी क्लिंटन यांची लढाई सुरू असताना, ओबामांच्या काही विधानांनी माझे लक्ष वेधून घेतले. त्यातही फिलाडेल्फियात त्यांनी केलेले भाषण विलक्षण होते. प्रत्यक्षात तसेच एक भाषण त्यांनी डेमोक्रॅटिक पक्षाच्या २००४च्या अधिवेशनात केले होते. मात्र ते माझ्या वाचण्यात आले नव्हते. फिलाडेल्फियातील त्यांच्या भाषणाचा मजकूर डॉ.प्रदीप आवटे यांनी मला 'मेल' केला. ते भाषण वाचून मी आंतर्बाह्य हललो. जातीअंताच्या लढाईविषयी तोवर मी कितीतरी लेखन केले होते आणि भाषणेही दिली होती. मात्र त्याचा असा जिवंत पुरावा मला सापडेल, अशी कल्पना नव्हती. ओबामा तेच बोलत होते, जे स्वप्न माझ्यासारखे कितीतरी लोक पहात होते. त्या भाषणानंतर ओबामांना मी सिरिअसली घेऊ लागलो. मग मी त्यांची पुस्तके वाचली. त्याविषयी एक लेखही 'लोकसत्ता'त लिहिला. हा माणूस निवडून येईल का, असा प्रश्न मला पडला. ओबामांप्रमाणेच माझा भरवसाही तरुण पिढींवर होता. त्यामुळे ते जिंकणार, असे लक्षात येऊ लागले. या सगळ्याविषयी काहीतरी लिहायला हवे, असे वाटू लागले, पण म्हणजे काय करायचे, ते नीट समजेना. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अंगाने या बदलाचा वेध घ्यावा, असे सुरुवातीला वाटले. मग एका ललित पुस्तकाचीही कल्पना डोक्यात आली. ओबामांचे चरित्र लिहावे असेही वाटले. पण काहीच मजा येईना. ओबामा जिंकोत किंवा हरोत; त्यांच्यावर लिहिले पाहिजे असे मात्र वाटत होतेच. आणि निकाल जाहीर झाला. ओबामा जिंकले. हे सारे अद्‌भुत होते, मात्र बदललेल्या जगाचा तो पुरावा होता. जग बदलले म्हणूनच ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष होऊ शकले.

त्यांचे शिकागोतील विजयी भाषण मी पहात, ऐकत होतो. त्यांनी भाषण सुरू केले... "If there is anyone out there, who still doubts that America is a place where all things are possible... this night is your answer!" हे भाषण मी ऐकले आणि माझ्या लक्षात आले, अरे हा तर 'मोटिव्हेशन गुरु' आहे. मग वाटले हा 'सक्सेस पासवर्ड' आहे. बदलत्या जगात हा असा 'ॲप्रोच'च तुम्हाला यश मिळवून देऊ शकतो. 'व्होट बँक' आणि 'बँक बॅलन्स' यांच्या पलीकडे राजकारण असू शकते, हे ओबामांनी जगाला सांगितले. मी खरोखरच उत्तेजित झालो होतो. लिहिणे-बोलणे या फुकाच्या गोष्टी आहेत; त्यामुळे काहीच साध्य होत नाही असे वाटून, एका अर्थाने कंटाळलेल्या माझ्यासारख्या तरुणाला ओबामांच्या त्या भाषणाने नवे चैतन्य दिले. अवघ्या अमेरिकेला नवे स्वप्न देणाऱ्या ओबामांनी मलाही प्रयोजन दिले. मग ठरले, लिहायचे! पुस्तकाचे प्रारूप ठरलेले होतेच. मग वेड्यासारखा लिहीत सुटलो. मला जे जाणवले ते सगळ्यांना सांगायचे होते. संवाद करायचा होता, सर्वांशी. त्यातही तरुणांशी. माझ्या सर्वसामान्य मित्रांशी. बदलते जग कसे 'सक्सेस फ्रेंडली'

आहे आणि ओबामासारखा, तुमच्या-आमच्यासारखा माणूस आज अमेरिकेचा अध्यक्ष कसा झाला आहे, हे सांगायचे होते. कोणतीही खोटी आशा मला द्यायची नव्हती किंवा निष्कारण 'पॉझिटिव्ह ॲटिट्यूड' ही द्यायचा नव्हता. ही सकारात्मकता नव्या जगात आहे आणि ओबामा ही त्याची अभिव्यक्ती आहे, एवढेच सांगायचे होते. त्याप्रमाणे लिहीत गेलो. लिहिताना प्रकरणं वगैरेही डोक्यात नव्हती. ती नंतर झाली. 'सो, धिस इज द स्टोरी!'

**◥ हे पुस्तक मराठी वाचकांनी असे डोक्यावर का घेतले असावे?**

◤ कारण तो शहाणा आहे! सर्वांना जे आवडते ते चटपटीत आणि वरवरचेच असते, असा एक समज ज्यांनी करून घेतला आहे, त्यांचा 'कॉमन मॅन'च्या या अंगभूत शहाणपणावर भरवसा नसतो. अशा हस्तिदंती मनोऱ्यातील मंडळींना या पुस्तकाने दिलेला विचार कधीच समजणार नाही. हे पुस्तक संजय आवटेंचे आहे म्हणून लोकांनी ते डोक्यावर घेतलेले नाही, कारण तसे असते तर माझी अन्य पुस्तकेही अशीच विकली जायला हवी होती. 'मनोविकास' प्रकाशनाने या पुस्तकाची निर्मिती विलक्षण अशीच केली आहे, पण हे देखणेपण त्या विक्रीचे कारण ठरू शकत नाही. किंमत ९९ रुपये आहे, हा 'मार्केटिंग'साठीचा चांगला मुद्दा असला, तरी साधारण अशीच किंमत असणारी अनेक पुस्तके वर्षानुवर्षे धूळ खात पडलेली आपण पाहतो. ओबामांविषयी लोकांना प्रचंड आकर्षण आहे हे खरे असेल, तर या विषयावरील सगळीच पुस्तके विकली जायला हवी होती! मला वाटते, या पुस्तकाचे यश हे वाचकांचे यश आहे. मराठी पुस्तकांच्या क्षेत्रातील हा इतिहास असेलच, तर तो वाचकांनी घडविला आहे. दोन महिन्यांत बारा आवृत्त्या हा चमत्कार मराठीत घडला, तो वाचकांमुळेच! कारण मराठी वाचकांनी हा विचार स्वीकारला आहे. त्यांना नवे जग समजून घ्यायचे आहे, त्यांना नव्या जगात यशस्वी व्हायचे आहे. जात-धर्म यांच्या पल्याड जाणारा बहुसांस्कृतिक विचारच त्यांना हवा आहे. दुर्दैवाने त्यांच्या अवतीभोवती असे पर्याय नाहीत. त्यामुळे नाईलाजाने ते संकुचित पर्याय निवडत असले तरी प्रत्यक्षात मात्र त्यांना असाच व्यापक पाया असणारा पर्याय हवा आहे. तो त्यांना ओबामांमध्ये दिसला. म्हणून त्यांनी पुस्तक डोक्यावर घेतले.

**◥ हे पुस्तक लिहून तुम्ही नेमके काय साध्य केले?**

◤ 'ऑर्कुट'वर, 'फेसबुक'वर, 'जी-मेल'वर ज्या प्रतिक्रिया मला मिळत आहेत, किंवा फोन, एसएमएसवरून लोक जे बोलत आहेत आणि या विषयावरील व्याख्यानांना दापोलीपासून सांगलीपर्यंत जो प्रतिसाद मिळत आहे, त्यावरून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे; ती म्हणजे- लोकांना आता सर्वंकष विचार हवा आहे. हा सर्वंकष विचार म्हणजे केवळ आदर्शवाद नाही. आपल्याकडील परिवर्तनवादी चळवळी जातीअंताविषयी बोलत राहिल्या; कल्याणकारी राष्ट्र आणि बहुसांस्कृतिकतेविषयी सांगत राहिल्या; सामाजिक समतेचे महत्त्व पटवत राहिल्या; पण त्या पराभूत झाल्या! कारण त्यांनी कधीच त्यांचा हा आदर्शवाद व्यवहाराशी जोडला नाही. नव्या जगाशी प्रामाणिक संवाद केला नाही. कुठल्या तरी मार्क्सच्या आणि जयप्रकाश नारायणांच्या वगैरे चष्म्यातून किंवा फुले-आंबेडकरांचे शब्द पाठ करून समतेचा विचार सांगितला गेला, कल्याणकारी राष्ट्राचा विचार मांडला गेला. मात्र तो विचार हा खऱ्या विजयाचा मंत्र आहे, हे ओबामांनी राजकारणाच्या आखाड्यात सिद्ध केले. अशा या बराक ओबामांना मी परिवर्तनवादी चळवळींच्या हातात दिले आहे. (नाहीतर अन्य अनेक घटकांनी त्याला आपल्या कामाला लावले असते!) अर्थात, स्वत:ला परिवर्तनवादी मानणारे विचारवंत एवढे परावर्तनवादी झाले आहेत की, स्वच्छ नजरेने या प्रक्रियेकडे पाहणेही त्यांना शक्य होत नाही.

**◥ तुम्हाला काय वाटते, ओबामा जग बदलेल?**

◤ अजिबात नाही. बराक ओबामांकडे मी 'व्यक्तिवादी' नजरेने अजिबात पहात नाही. उद्या ओबामा 'पंक्चर' झाले तरी त्यामुळे माझ्या मांडणीला जराही धक्का बसणार नाही. ओबामा अध्यक्ष झाल्यामुळे जग बदलेल, असे मी म्हणतच नाही; मी असे म्हणतो आहे की जग बदलल्यामुळे ओबामा अध्यक्ष झाले आहेत. असे हे बदललेले जग आपण समजून घ्यायचे आहे. जागतिकीकरण म्हणजे फक्त अर्थशास्त्राची-तंत्रज्ञानाची शैली नाही, तर ती नवी जीवनशैली आहे! तशी ती असेल तर ती किती सृजनशील, गतीशील आणि किती सर्वव्याप्त आहे हे लक्षात घेतले पाहिजे. माहिती-तंत्रज्ञानासारख्या क्रांतीमुळे सर्वांच्या हातात प्रगतीची संधी येऊ लागलेली असताना, लोकशाही वा अर्थकारणासारख्या व्यवस्था मूठभरांच्या हातात जात असतील, तर काही बदल घडवावे लागतील. ओबामांनी हा विचार मांडला तेव्हा अमेरिकेत जागतिक मंदी होती, हे लक्षात घेतले पाहिजे. सामाजिकदृष्ट्या विषमतेची व्यवस्था अर्थकारणाच्या पातळीवरही टिकू शकत नाही, हेच त्यातून स्पष्ट झाले. त्यामुळे ओबामांचा विचार हा स्वप्नाळू प्रकार नाही. ती अर्थकारण, राजकारण यासाठीची शास्त्रशुद्ध 'थिअरी' आहे. ग्लोबल समंजसपणातून आदर्शवादाच्या पल्याड गेलेल्या बुद्धिमान आणि प्रॅक्टिकल तरुणाईला ओबामांच्या मांडणीची अपरिहार्यता समजावी, हे मला जास्त महत्त्वाचे वाटते.

**◥ भारतात 'ओबामा' कोण असेल?**

◤ हा अत्यंत निरर्थक प्रश्न आहे. असा कोणीही एक ओबामा भारतात अवतरणार नाही. ओबामा हा अवतारी पुरुष असू शकत नाही. मुळात ओबामा आज जे सांगत आहेत, ते आपल्याकडे कितीतरी जणांनी कितीतरी वर्षांपूर्वी सांगितले. 'कल्याणकारी राष्ट्र' या संदर्भातील ओबामांची मांडणी किंवा त्यांची सर्वंकषता आपल्याकडे डॉ.आंबेडकर आणि नेहरू यांनी कितीतरी विस्ताराने विशद केली आहे, त्यामुळेच तर भारतीय लोकशाहीचा प्रयोग यशस्वी झालेला दिसत आहे. लोकशाहीच्या यशापयशाचा विचार करायचा तर भारताची व्यवस्था अमेरिकेपेक्षाही अधिक प्रगल्भ-समंजस आहे, पण तरीही काँग्रेससारखा सर्वसमावेशकता सांगणारा पक्ष उत्तरोत्तर सरंजामी होत गेला आणि भाजपसारखा मूलतत्त्ववादी पक्ष त्याला आव्हान देणारा पक्ष म्हणून पुढे आला. 'राइज ऑफ द रेस्ट' या न्यायाने छोटे छोटे प्रादेशिक पक्ष स्वाभाविकपणे उदयाला आले आणि त्यांची एकूण शक्ती या दोन मुख्य पक्षांपेक्षाही जास्त झाली. या सगळ्या गदारोळात आपले

राजकारण ‘व्होट बँक’ नावाच्या गोष्टीचे गुलाम झाले. एक व्यवच्छेदक राजकीय वर्ग विकसित होत गेला. पैशांवरच राजकारण उभे राहू शकते, असा समज तयार झाला. परिणामत: भारतीय राजकारणाला झुंडशाहीचे रूप प्राप्त झालेले दिसत आहे.

ज्या तरुणांच्या हाती सत्तेची सूत्रे येत आहेत, असे आपण मानतो, ते तरुण कोण आहेत? राहुल गांधी, मिलिंद देवरा, सचिन पायलट, ज्योतिरादित्य शिंदे, सुप्रिया सुळे, ओमर अब्दुल्ला.... जीवनाची सगळी क्षेत्रे सर्वांसाठी खुली असताना राजकारणाने मात्र सगळे दरवाजे बंद करून घेतले आहेत. अमेरिकेत तीन-साडेतीन वर्षे लोक अगदी नॉन-सिरिअस विषयांवर हव्या त्या गप्पा मारतात; पण निवडणुकीच्या रिंगणात मात्र मूलभूत विषयांवर चर्चा झडतात. आपल्याकडे एरव्ही आपण फार सिरिअस- लंब्या-चौड्या गोष्टी करीत असतो; मात्र निवडणूक जवळ आली रे आली की एवढ्या सुमार आणि गल्लाभरू गोष्टी सुरू होतात की निवडणूक म्हणजे रेड्यांची टक्कर वाटावी! यातून आपल्या राजकारणाचे अध:पतन झाले आहे. या पार्श्वभूमीवर ओबामांच्या राजकारणाकडे पाहिले पाहिजे. हा विचार घेऊन राजकीय प्रक्रियेत उतरणे तरी भारतात शक्य आहे का, हा खरा मुद्दा आहे. पंधराव्या लोकसभा निवडणुकीच्या तारखा आता जाहीर झाल्या आहेत. ‘व्होट बँक’च्या पलीकडे जाऊन मतदारांना आकृष्ट करणे भारतात शक्य आहे का, हा मुद्दा आहे. कोणत्याही वृथा भावनिक विषयांना हात न घालता ‘अजेंडा’ या केंद्रबिंदूभोवती निवडणूक होणे शक्य आहे का, हा प्रश्न आहे. भारताला ओबामा हवा तो या अंगाने, म्हणून आपल्याला ५४५ ओबामा हवे आहेत.

**◥ ओबामांच्या विजयामुळे भारतातील दलित, शोषितांच्या चळवळीला प्रेरणा मिळेल काय?**

◤ नक्कीच! ओबामांनी अब्राहम लिंकन यांच्या बायबलवर हात ठेवून शपथ घेतली. कारण ते लिंकन यांच्या खांद्यावर उभे आहेत. लिंकनच काय, मार्टिन ल्यूथर किंग, जेसी जॅक्सन यांच्याही खांद्यावर ते उभे आहेत. प्रत्यक्षात यापैकी कोणीही तत्त्वज्ञान या अर्थाने काही विकसित केलेले नाही. आपल्याकडे फुले-आंबेडकरांनी तत्त्वज्ञान उभे केले हे खरे; पण त्यांच्या खांद्यावर एकही राजकीय नेतृत्व उभे नाही. ओबामांचा विजय हा फुले-आंबेडकरांच्या विचारांचाच विजय आहे. मात्र आमची दलित चळवळ या विचारांपासून कितीतरी कोस दूर गेली आहे. त्यामुळे यापैकी कोणालाही ओबामांशी नाते सांगता येणार नाही. दलित-शोषित चळवळीची फेरमांडणी करून ‘व्होट बँक’च्या पल्याडचे राजकारण यशस्वी होऊ शकते, हे ज्याला समजेल, त्याला ओबामांचा विजय खऱ्या अर्थाने समजेल. ‘बदला’ वा ‘मोबदला’ म्हणून राजकीय प्रक्रियेकडे आजवर पाहणाऱ्यांना त्याच्या पुढे असणारा ‘बदल’ त्यामुळे दिसणार आहे. आंबेडकरांचे नाव घेऊन जातींचेच राजकारण होणार असेल किंवा ‘सोशल इंजिनिअरिंग’च्या नावाखाली तत्त्वशून्य- नफेखोरीचे निर्लज्ज सत्ताकारण रंगणार असेल, तर उपयोग काय? राज ठाकरे यांच्यासारखा नेता संकुचित-टोकदार भूमिका घेऊन उभा राहतो आणि तरुणांचा त्याला काही प्रमाणात पाठिंबाही मिळतो, हे आपण पाहतो. ही सगळी ‘स्पेस’ अशा राजकारणाला उपलब्ध झाली ती काँग्रेसच्या सत्तालोलुप सरंजामी राजकारणामुळे, समाजवादी-साम्यवाद्यांच्या भंपकपणामुळे आणि दलित चळवळीच्या तत्त्वशून्यते-मुळे! शिवाय, त्याला आणखी एक परिमाण आहे. आजवर आपल्या राजकीय नेत्यांनी तरुणांना गृहीत धरले. त्यांना ‘अॅड्रेस’ केले नाही. त्यामुळे राजसारखे नेते आज त्यांना आकृष्ट करू शकतात. दलित राजकारणाला ओबामांच्या निमित्ताने फेरमांडणी करण्याची इच्छा झाली आणि आंबेडकरांच्या मूळ विचारांकडे परतण्याची आस निर्माण झाली, तर ते आश्वासक ठरेल. भारतीय राजकारणाची शैली बदलली पाहिजे, असे वाटणाऱ्यांसाठी ओबामांचे प्रारूप हा एक पर्याय असू शकतो! आरक्षणाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी, इतिहासाकडे बघण्याची पद्धत, मुस्लिम जगाशी संवाद साधण्याची शैली, कॉर्पोरेट लॉबीला सामाजिक भान देणारी वक्तव्ये, वंशभेदाविषयाची भूमिका, अर्थकारणाविषयीची मते यातून जे ओबामा दिसतात, ते बदलत्या संदर्भात अधिक महत्त्वाचे. आपल्या राजकारणाने शिकावे, असे ओबामांकडे बरेच काही आहे! खरे म्हणजे, हे सगळे आपल्याकडे आहे. त्या मूल्यांची नेहरू ही अभिव्यक्ती होती. नेहरूंनी मांडलेले भारताचे स्वप्न फार वेगळे नव्हते. (भारतीय राजकारणाचे वैशिष्ट्य असे की, आजही भाजपसारख्या पक्षालासुद्धा त्यांचा छुपा अजेंडा जाहीरपणे मांडून निवडणूक जिंकता येत नाही किंवा त्या अर्थाने धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेला विरोध करता येत नाही.) मात्र आज आपण अशा वळणावर आहोत की आपल्या राजकीय प्रक्रियेला या स्वप्नाचा गंधही नाही. म्हणून समकालीन ओबामांकडे पहायला हवे.

**◥ या पुस्तकासाठी कोणाकोणाचा हातभार लागला?**

◤ अनेकांचे हात! पण ‘मनोविकास’ प्रकाशनाचे अरविंद आणि आशिश पाटकर यांना मी संपूर्ण गुण देऊ इच्छितो. हा विषय मी सांगताच ज्या पद्धतीने त्यांनी ‘व्हिज्युअलाइज’ केला आणि त्याची निर्मिती केली, ती पद्धत असामान्य होती. गिरीश सहस्रबुद्धे यांचे मुखपृष्ठ तर एवढे सुंदर आहे की, माझा कोणताही वाचक मुखपृष्ठाविषयी बोलल्याशिवाय राहूच शकत नाही. या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करणाऱ्या आणि प्रसंगी डिक्टेशन्स घेणाऱ्या स्मिता पाटील-वळसंगकर, प्रीती अवचार; संदर्भ मिळवून देणाऱ्या वैशाली चिटणीस आणि मुख्य म्हणजे ज्यांच्यामुळे मला बदलत्या जगाविषयी आणखी औत्सुक्य निर्माण झाले ते कुमार केतकर, अरुण साधू, डॉ.प्रदीप आवटे, कमलेश वालावलकर. खरे म्हणजे या प्रश्नाचे उत्तरच देता येणार नाही, एवढे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हात कोणत्याही प्रकल्पासाठी उपयुक्त ठरत असतात. तरुण मित्र-मैत्रिणींशी असणारा अव्याहत ‘डायलॉग’ हे तर माझ्या अवघ्या लेखनाचेच बळ. ... त्यामुळे अशा अनेक गोष्टी .

**◥ बदलत्या जगातील तरुणाईला काय सांगाल?**

◤ ज्ञात मानवी इतिहासाचा विचार करता, हा सर्वश्रेष्ठ आणि सर्वांचा कालखंड आहे. आपण सर्वजण एका ‘ग्रेट’ जगात जगत आहोत... सो! गो अहेड... धिस इज अवर टाइम!

**संजय आवटे**

बी-१०६, अवंती अपार्टमेंट, डावी भुसारी कॉलनी,
कोथरूड, पुणे ३८. Mob. : 9881256009



मस्करिका
महेश केळुसकर
मूल्य : रु. ९०/–
ऐन निवडणुकीच्या तोंडावर
राजकीय फटाके



मुंबई होते उद्योगनगरी
गंगाधर गाडगीळ
मूल्य : रु. ६०/–

जमशेटजी टाटा आणि नारायण मेघाजी लोखंडे यांचा परिचय करून देत मुंबई ह्या उद्यमनगरीची घडण उलगडणारं लेखन



मैं शायर तो नहीं...
नंदिनी आत्मसिद्ध
मूल्य : रु. २२५/–

हिंदी चित्रपटसंगीतावर शाब्दिक अधिराज्य गाजवणाऱ्यांचा विहंगम आलेख



झिनझिनाट
महेश केळुसकर
मूल्य : रु. १००/–
वय वर्षं आठ ते साठ
सगळ्या महाराष्ट्राची
तोंडपाठ



सेंट्रल बस स्टेशन
वसंत नरहर फेणे
मूल्य : रु. १६०/–

फेणे यांचीच दुर्मिळ कादंबरी 'सेंट्रल बस स्टेशन' पुनःप्रकाशित



मस्त राहावं कसं?
शिवराज गोर्ले
मूल्य : रु. १७५/–

आपली मनःशांती आपल्याच हाती!
मानसिक संतुलनाची सूत्रं उलगडणारं पुस्तक



जगप्रसिद्ध पुलांच्या कहाण्या
श्री. सुधीर शं. कुलकर्णी
मूल्य: रु.१५०/–
जगभरातील सारा सुप्रसिद्ध पुलांच्या निर्मिती प्रक्रियेची माहिती देणारं अभ्यासपूर्ण पुस्तक



साम्स ऑफ माइंड
(मनाचे श्लोक)
शंकर बी. पंडित
मूल्य : रु. १२५/–

कालातीत वाङ्मयाचा अस्सल नमुना असणारे समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक आता इंग्रजीत!

# ग्रंथायन प्रकाशन

## ENGLISH BOOKS

1. Sai Baba - Spiritual Masters : Sonavi Desai - Rs. 195/-
2. The Buddha - Spiritual Masters : Supriya Rai - Rs. 150/-
3. Shiva to Shankara - Decoding the Phallic Symbol : Dr.Devdutt Pattanaik - Rs. 225/
4. Hinduism - Triumphs & Tribulations : S.K. Kulkarni - Rs. 299/-
5. Gandhi - A Spiritual Journey : M.V. Kamath - Rs. 195/-
6. Mein Kampf - Autobiography : Adolf Hitler - Rs. 150/-
7. Jawaharlal Nehru - A Biography : Frank Moraes - Rs. 295/-
8. Albert Einstein - A Biography : Alice Calaprice & Trevor Lipscombe - Rs. 295/-
9. Stephen Hawking - A Biography : Kristine Larsen - Rs. 295/-
10. Oprah Winfrey - A Biography : Helen S. Garson - Rs. 295/-
11. Martin Luther King, Jr. - A Biography : Roger Bruns - Rs. 295/-
12. The Dalai Lama - A Biography : Patricia Cronin Marcello - Rs. 295/-
13. Business The Bill Gates Way : Des Dearlove - Rs. 229/-
14. Heroes & Villains - Nelson Mandela : Andy Koopmans - Rs. 150/-
15. Chanakya on Management : Askok R. Garde - Rs. 250/-
16. Last minute interview tips : Brandon Toropov - Rs. 150/-
17. How to succeed in Group Discussions & PersonalInterviews : Dr. S. K. Mandal - Rs. 150/-
18. Effective Communication & Public Speaking : S.K. Mandal - Rs. 195/-
19. Oliver Twist : Charles Dickens - Rs. 135/-
20. David Copprefield : Charles Dickens - Rs. 135/-
21. Tresure Island : Robert Louis Stevenson - Rs. 135/-
22. Adventures of Robinhood : Howard Pyle - Rs. 135/-
23. The right way to improve your English : J.E. Metcalfe - Rs. 150/-
24. Nature Cure for Cancer :Dr. H.K. Bakhru - Rs. 175/-
25. A Complete Handbook of Nature Cure : Dr. H.K. Bakhru - Rs. 295/-
26. Khallas - An A to Z guide to the underworld : J. Dev - Rs. 275/-
27. Daily Inspiration : Robin Sharma - Rs. 250/-
28. The Greatness Guide : Robin Sharma - Rs. 250/-
29. Who will cry when you die? : Robin Sharma - Rs. 175/-
30. 305 steps to self-confidence : David Lawrence Preston - Rs. 195/-
31. The Greatness Guide 2 : Robin Sharma - Rs. 195/-
32. Discover your destiny : Robin Sharma - Rs. 195/-
33. Family Wisdom : Robin Sharma - Rs. 195/-
34. Leadership Wisdom : The 8 rituals of visionary leaders - Robin Sharma - Rs. 195/-
35. The monk who sold his ferrari : Robin Sharma - Rs. 250/-
36. The Prophet : Khalil Gibran - Rs. 75/-
37. The mind of Swami Vivekananda : Gautam Sen - Rs. 125/-
38. Vedic Mathematics Made Easy : Dhaval Bhatia - Rs. 125/-
39. You can negotiate anything : Herb Cohen - Rs. 195/-
40. 50 Powerful ideas to keep your Customers : Paul R. Timm - Rs. 150/-
41. PR & Media Relations : Dr. G.C. Banik - Rs. 195/-
42. Can not walk, So what? : N.D. Dharap - Rs. 185/-

## Swami Sukhabodhananda

1. Looking at life differently - Rs.250/-
2. Oh mind relax please - Rs.250/-
3. Oh life relax please - Rs.250/-
4. Meditation - Rs. 150/-
5. Wordless Wisdom - Rs. 250/-
6. Roar your way to excellence - Rs. 250/-
7. Harmonising Inner - Rs. 250/-
8. Stress Management - Rs.150/-
9. Karma Yoga - Rs. 250/-
10. Personal excellence - Rs. 250/-
11. Celebrating success - Rs. 250/-
12. Art of wise parenting - Rs. 250/-
13. Golden words - Rs.25/-
14. Inspiring Thoughts - Rs. 25/-

४१६, चौथा मजला,
हिरेन इंडस्ट्रियल इस्टेट,
मोगल लेन, माहीम,
मुंबई – १६.
दूरध्वनी : ६७२८०९९९.
www.granthayan.com



# उदारमतवादाचा वारसा : 'ऑन लिबर्टी'

## सुमन ओक

**ब्रिटिश तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट मिल यांनी लिहिलेल्या 'ऑन लिबर्टी' या ग्रंथाने एकोणिसाव्या शतकातील बुद्धिवंतांच्या विचारालाच कलाटणी दिली. हा ग्रंथ प्रसिद्ध झाला त्या घटनेला फेब्रुवारी २००९ मध्ये १५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने ग्रंथाची व लेखकाची ओळख करून देणारा हा लेख...**

'केवळ एक व्यक्ती सोडून साऱ्या मानवजातीचे एकमत झाले तरीही त्या एका व्यक्तीला आपलं वेगळं मत व्यक्त करण्यापासून थांबवणं न्याय्य नाही. त्या एका व्यक्तीने (त्याच्यामधे इतरांना आपले मत व्यक्त करण्यापासून रोखण्याची ताकद असली तरी) साऱ्या मानवजातीला रोखणे जितके अन्याय्य आहे, तितकेच इतर सर्वांनी त्या एका व्यक्तीला रोखणेही अन्याय्यच आहे..' हे सूत्र 'ऑन लिबर्टी ' या पुस्तकाचा गाभा आहे.

### जॉन स्टुअर्ट मिल यांचे तत्त्वज्ञान

जॉन यांचे वडील जेम्स मिल हे उपयुक्ततावादी (युटिलिटेरियन) विचारपरंपरेतील एक प्रमुख तत्त्वज्ञ होते. कोणत्याही वस्तूचं, अनुभवाचं मूल्य त्याच्या उपयुक्ततेतून सिद्ध होत असतं अशी यातील तात्त्विक भूमिका आहे. मनुष्यजीवनाचं श्रेयसही याच संदर्भात सिद्ध केलं जातं, ते असं : माणूस स्वतःला अधिकाधिक सुख मिळवायचा प्रयत्न सतत करीत असतो. म्हणून 'अधिकाधिक माणसांचं अधिकाधिक सुख' हे मनुष्यजीवनाचं ध्येय बनतं. जास्तीत जास्त माणसांनी स्वतःच्या सुखाचा पाठपुरावा केल्याने समाजाचं भलं होईल. परंतु हे श्रेयस प्रतिपादन करताना उपयुक्ततावादाला व्यक्तिवादी उदारमतवादी गृहीतकाचा आधार असावा लागतो. ह्या गृहीतकानुसार समाज सुट्या सुट्या व्यक्तींचा बनलेला आहे. त्यामध्ये प्रत्येकाला स्वतःच्या सुखाचा शोध घेण्याची मोकळीक हवी. साऱ्यांच्या सुखाच्या शोधांची बेरीज म्हणजे समाजाचं सुख. या तांत्रिक गृहीतकातून उपयुक्ततावादावर असलेल्या वैज्ञानिक क्रांतीचा प्रभाव दिसून येतो.

जॉन मिल यांनी उपयुक्ततावादाची नव्याने मांडणी केली. ही मांडणी इंग्लंडमधील बदलत्या स्वरूपातील भांडवलशाहीला पूरक होती. त्यांनी या तत्त्वज्ञानाला व्यक्तिस्वातंत्र्य, प्रातिनिधिक लोकशाही शासन पद्धती आणि कल्याणकारी राज्य याबाबतच्या विचारांची जोड दिली आणि एका नवीन राजकीय विचारसरणीचा पाया घातला. यामध्ये व्यक्तीचे स्वातंत्र्य केन्द्रस्थानी आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचे दोन पैलू आहेत. एक वैयक्तिक म्हणजे केवळ स्वतःशी संबंधित व दुसरा सामाजिक म्हणजे इतरांशी संबंधित असलेला. स्वतःशी संबंध असलेल्या आचारविचारांमधे व्यक्तीला पूर्ण मोकळीक, संपूर्ण स्वातंत्र्य असायला हवे. कारण व्यक्तीच्या या वागण्याचा इतरांवर परिणाम होत नसतो. व्यक्तिस्वातंत्र्याच्या या मुद्यामध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर विशेष भर दिलेला आहे, तसाच स्त्रीच्या स्वातंत्र्याचा आणि अल्पसंख्याकांच्या हक्कांचाही जोरदार पुरस्कार केलेला आहे.

स्वत:शी संबंधित कृतीच्या संदर्भात व्यक्तीला पूर्ण मोकळीक देतांना सुखाच्या कल्पनेवर आधारित असलेल्या उपयुक्ततावादाचीही जॉन स्टुअर्ट मिल यांना नव्याने मांडणी करावी लागली. जास्तीत जास्त सुखाचा विचार करताना केवळ संख्यात्मक निकष लावून भागणार नाही तर त्याचबरोबर सुखाच्या गुणवत्तेचाही विचार करायला हवा. म्हणून सुखाला नैतिक निकष लावण्याची गरज आहे हे प्रथम मिल यांनी सांगितले. अशा तऱ्हेने नैतिक निकष लावून सरस ठरलेल्या अत्युच्च सुखाच्या शोधाचे आत्मशोधात परिवर्तन व्हायला पाहिजे.

व्यक्तीच्या इतरांशी संबंधित असलेल्या व इतरांवर परिणाम करणाऱ्या सामाजिक कृतींच्या संदर्भात शासनाच्या हस्तक्षेपाची गरज मिल यांनी ओळखली. तसे पाहिले तर मिल यांच्या व्यक्तिवादानुसार व्यक्तिजीवनामधे शासनाचा हस्तक्षेप व्यक्तीच्या विकासास बाधा ठरतो. परंतु इथे मिल यांचे आणखी एक तत्त्व कार्यरत होते. ते म्हणजे आर्थिक क्षेत्रातील कल्याणकारी कार्यक्रमाची संकल्पना. या संदर्भात मिल यांच्या मते शासनाने सामाजिक क्षेत्रांमधे हस्तक्षेप करणे आवश्यक आहे.

राजकीय क्षेत्रामधे मिल यांनी लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या शासनाचा पुरस्कार केला, परंतु ह्या प्रतिनिधींनी व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करावी आणि लोकांना सदैव जबाबदार रहावे अशी रास्त अपेक्षा ठेवली. अशिक्षित अशा बहुसंख्य लोकांच्या हातात समाजाची सूत्रे जाणे किंवा शासनाची सत्ता जाणे धोक्याचे आहे, म्हणून सुशिक्षित व्यक्तींकडे ही सूत्रे व शासन सोपवायला हवे असेही मिल यांचे मत होते. मिल यांचे हे तत्त्वज्ञान भांडवलशाहीच्या बदलत्या समाजरचनेसाठी एक वैचारिक आधार ठरले. मिल यांना आधुनिक उदारमतवादाचे प्रणेते म्हणून गौरविण्यात येते.

**मिल यांचे जीवनचरित्र**

जॉन यांचा जन्म लंडनच्या पेण्टनव्हिल या विभागात २० मे १८०६ या दिवशी झाला. जॉन कधी शाळेत गेलेच नाहीत. त्यांचे सारे शिक्षण त्यांचे वडील व वडिलांचे दोन मित्र – उपयुक्ततावादाचे प्रणेते जेरेमी बेंथॅम आणि फ्रान्सिस प्लेस – यांच्या मदतीने घरीच झाले; परंतु अत्यंत कडक शिस्तीमधे. स्वत:च्या भावंडांखेरीज त्यांना इतर मुलांमधे कधीच मिसळू दिले गेले नाही. जेम्स मिल साहचर्यवादी (ॲसोसिएशनिझम) होते. एक प्रज्ञावन्त निर्माण करण्याचे त्यांचे ध्येय होते. असा प्रज्ञावन्त जो उपयुक्ततावादाचा जोमाने पुरस्कार करील आणि प्रत्यक्ष कृतीत उतरवील.

मिल यांच्या बुद्धीची अगदी लहान वयातच अफाट वाढ झाली होती. वयाच्या तिसऱ्या वर्षीच ते ग्रीक भाषा शिकले. व आठव्या वर्षापर्यंत त्यांचे इसापच्या गोष्टी, झेनोफोनचे ॲनॅबिस वाचून झालेले होते. ल्युसियस, डायोजेनिस, प्लेटो यांचे डायलॉग्ज इत्यादींशीही त्यांची ओळख झालेली होती. तोपावेतो इतिहास व गणित या विषयांचाही त्यांचा बराच अभ्यास झालेला होता. या सुमाराला त्यांनी लॅटीन भाषा, यूक्लिडची भूमिती आणि बीजगणिताचा अभ्यास करायला सुरुवात केली. होरेस, व्हर्जिल, होमर इत्यादींचे सर्वसाधारणपणे कॉलेजमधे जाणारे विद्यार्थी वाचतात ते वाङ्मय वाचले होते. दहाव्या वर्षापर्यंत ते प्लेटो आणि डेमोस्थेनीस सहजपणे वाचू शकत होते. याबरोबर त्यावेळच्या लोकप्रिय कादंबऱ्याही ते वाचीत असत. पुढे ऑक्सफर्ड किंवा केंब्रिजसारख्या विश्वविद्यालयात जाण्यास त्यांनी नकार दिला, कारण अँग्लिकन चर्चच्या आज्ञेत राहणे त्यांना मान्य नव्हते. त्याऐवजी त्यांनी आपल्या वडिलांबरोबर 'ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी'मधे १८५८ पर्यंत काम केले.

१८१८ साली जेम्स मिल यांचे भारताचा इतिहास (हिस्टरी ऑफ इंडिया) हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यानंतर १२व्या वर्षी जॉन मिल यांचा तर्कशास्त्राचा सखोल अभ्यास सुरू झाला. पुढच्याच वर्षी त्यांची राजकीय अर्थशास्त्राशी ओळख करून देण्यात आली; आणि त्यांनी वडिलांबरोबर ॲडॅम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो यांचाही अभ्यास केला. या अभ्यासातून जेम्स मिल यांचे 'रिकार्डो यांच्या अर्थशास्त्राची मूलतत्त्वे' (एलिमेंट्स ऑफ रिकार्डियन इकॉनॉमिक्स) हे पुस्तक सिद्ध झाले.

आपल्या पित्याच्या या शैक्षणिक तालमीचे आपल्या आत्मचरित्रात जॉन स्टुअर्ट मिल वर्णन करतात: ही तालीम एक विचारवंत निर्माण करण्यासाठी अगदी योग्य होती. पण ही पद्धती राबवण्यासही माझ्या वडिलांसारख्या एका महान विचारवंताचीच गरज आहे. मी सर्व विषयांमधे खूप रस घेत असतानासुद्धा हा मार्ग जसा मला काट्याकुट्यांनी भरलेला वाटला तसाच तो त्यांच्यासाठीही होता. जिथे यशाची आशा करता येणार नाही अशा कठीण समस्यांमधेही मी अपयशी झालो तर ते खूप रागावत. सर्व समस्या मला स्वकष्टाने सोडवाव्या लागत व त्यानंतरच ते आपले स्पष्टीकरण देत असत. त्यामुळे तर्कशास्त्र आणि राजकीय अर्थशास्त्र या दोन्ही विषयांचे मला अचूक ज्ञान तर मिळालेच पण या विषयांमधला मी एक विचारवंतही बनलो. एवढा की काही काळानंतर मी माझे मुद्दे त्यांच्यापुढे मांडून त्यांच्या मतांचे परिवर्तनसुद्धा करू शकलो. यातून त्यांचा निखळ प्रांजळपणा व त्यांच्या शिक्षणपद्धतीचे मूल्य दिसून येते.

या अथक बौद्धिक परिश्रमांचा परिणाम मिल यांच्या मेंदूवर झाला. आणि ऐन विशीमधे त्यांना मानसिक थकवा (नर्व्हस ब्रेकडाऊन) आला. या कठोर तालमीमध्ये आणि परिश्रमांमध्ये नैसर्गिक भावभावनांच्या जोपासनेला व अभिव्यक्तीला मोकळा अवसर मिळाला नव्हता. त्यावेळी त्यांना जीन फ्रँकोइस मारमाँटेल यांच्या आठवणी आणि विल्यम वड्सवर्थच्या कविता यांच्या वाचनातून दिलासा मिळाला, त्यांचा मानसिक थकवा नाहीसा झाला. तसेच 'ऑन लिबर्टी' या पुस्तकात स्वत:च्या इतकाच आपली पत्नी हॅरियेट हिचाही बरोबरीचा वाटा आहे असे ते आत्मचरित्रात नमूद करतात.

जॉन मिल व हॅरियेट टेलर यांच्या संबंधांबद्दल लिहिणे आवश्यक आहे. हॅरियेट यांचे जॉन टेलर या व्यावसायिकाशी लग्न झालेले होते व त्यांचा संसार सुखाने चालला होता. परंतु श्री.टेलर यांची व्यवसायाव्यतिरिक्त इतरत्र फारशी बुद्धी चालत नसल्याने ते आपल्या पत्नीला बौद्धिक पातळीवर साहचर्य देण्यास असमर्थ होते. त्याउलट हॅरियेट 'वेस्टमिन्स्टर रिव्ह्यू' या नियतकालिकात तत्त्वज्ञानविषयक लेखन करीत असे. त्या क्षेत्रांत उद्‌भवणाऱ्या समस्यांविषयी जॉन मिल हे योग्य मार्गदर्शन करू शकतील असे तिला तिच्या मित्रांनी सुचविले. त्या दोघांची १८३० मधे भेट झाली. त्यांची ओळख झाली तेव्हा हॅरियेटला दोन मुले होती. पुढच्या वर्षी ती आणखी एका मुलाची आई झाली. परंतु मिल व हॅरियेट यांची मैत्री दृढ होत राहिली. ती दोघे लांबचे प्रवासही एकमेकांच्या बरोबर करू लागली. श्री.टेलर यांनीही या संबंधाबद्दल नाराजी व्यक्त केली नाही, परंतु लोकापवादाचा इशारा तेवढा दिला. त्या काळी घटस्फोट मिळणे अशक्यच होते. १८४९ साली टेलर यांचा मृत्यू झाल्यावर, म्हणजे ओळख झाल्यावर २१ वर्षांनी जॉन मिल व हॅरियेट यांनी लग्न केले. पण दुर्दैवाने अवघ्या सात वर्षांतच त्यांच्या सुखी संसाराचा हॅरियेटच्या निधनामुळे अंत झाला.

**ऑन लिबर्टी या पुस्तकाबाबत थोडेसे**

या दांपत्याच्या बौद्धिक प्रयासातून जन्मलेले 'ऑन लिबर्टी' हे पुस्तक त्यानंतर १९५९ मधे जॉन मिल यांच्या नावे प्रसिद्ध झाले. ते हॅरियेटला अर्पण करताना जॉन मिल यांनी तिची अफाट स्तुती केली आहे. इतर तत्त्ववेत्त्यांच्या पुढे जाऊन मिल यांनी (इतरांना होणारी) इजा हे तत्त्व (हार्म प्रिन्सिपल) जास्त विकसित केले. प्रत्येक व्यक्तीला जोपर्यंत त्याच्या वागण्याने इतरांना त्रास पोचत नाही तोपर्यंत आपल्या मनाप्रमाणे वागण्याचा अधिकार आहे. आणि जोपावेतो त्या वागण्याचा परिणाम केवळ त्या व्यक्तीपुरताच मर्यादित असतो तोपावेतो समाजाला (जरी त्याच्या वागण्याने ती व्यक्ती स्वत:चे नुकसान करीत असली तरी) त्यामध्ये हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. याला अपवाद फक्त जे स्वतःचे नियंत्रण करण्यास असमर्थ आहेत अशा लहान मुले आणि अतिमागास व्यक्तींचाच असू शकतो. समाजाच्या रूढी किंवा समाजाने मान्य केलेली नैतिकता यांच्या आड येणारे वर्तन या कारणावरून समाज व्यक्तीला रोखू शकत नाही. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही या पुस्तकात जोरदार पुरस्कार केलेला आहे. बौद्धिक व सामाजिक विकासासाठी मोकळ्या वातावरणात वादविवाद होणे अत्यंत गरजेचे आहे. अशा वादविवादातून आपण बरोबर आहोत का व चुकत असल्यास कुठे चुकतो हे प्रत्येकाला समजू शकेल. आपला समज खरा आहे एवढेच कळणे पुरेसे नाही तर तो का खरा मानायचा ह्याचाही ऊहापोह व्हायला पाहिजे.

### ‘ऑन लिबर्टी’ प्रसिद्ध झाल्यानंतर

१५० वर्षांनी व मिल यांच्या निधनानंतर १०० पेक्षा जास्त वर्षे उलटून गेल्यावर समाज आणि जग खूप बदलले आहे. मिल यांचा कल अनियंत्रित वैयक्तिक नैतिकतेकडे झुकलेला होता. (या दृष्टिकोनाला बऱ्याच कायदेतज्ज्ञांकडून व इतरांकडूनही आक्षेप घेतला जातो.) पण आजचा उदारमतवाद थोडा वेगळा आहे. आधीच्या काळातील उदारमतवाद्यांना सामाजिक क्षेत्रांमधे शासनाचा कमीत कमी हस्तक्षेप असावा असे वाटे, परंतु नंतर अनेक सामाजिक क्षेत्रांमधे त्यांना शासनाने कायदे करणे आवश्यक वाटू लागले. त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्याला काही धोका उत्पन्न होईल अशी भीती वाटली नाही. आणि थोडेफार स्वातंत्र्य हिरावले गेले तरी असे कायदे आवश्यक वाटले. मिल यांच्या मते समाजाने व्यक्तीवर कोणतीही बळजबरी करू नये. केवळ अमली पदार्थाचे व्यसन, स्त्रिया व मुले यांच्यासाठी कामाचे तास अशांसारख्या गोष्टी शासनाने हाताळाव्यात. मिल यांचा रोष शासनाच्या जबरदस्ती आणि बळजबरीपेक्षा समाजाकडून व्यक्तीवर होणाऱ्या बळजबरीवर जास्त आहे. त्यांच्या काळी शासन आजच्या एवढे सर्वव्यापी व सर्वशक्तिशाली झालेले नव्हते. जॉन स्टुअर्ट मिल व्यक्तिवैशिष्ट्य आणि विक्षिप्तपणा यांच्यामधे गल्लत करतात असाही त्यांच्यावर आरोप केला जाई. अनैतिक वागण्याला अशा वागण्यामधे इतरांबाबतच्या कर्तव्यांमधे काही कुचराई नसली तरीही कायद्याने शिक्षा व्हायलाच हवी असे अनेकांचे मत होते. मिल यांच्या मतांबाबत कितीही उलटसुलट ऊहापोह झाला असला तरी मिल यांनी मानवतेला दिलेला उदारमतवादाचा वारसा आजच्या काळात किती महत्त्वाचा आहे हे सर्वच जाणतात.

देशाला जर महान विचारवंत घडू द्यायचे असतील तर सत्याचा शोध घेणे आवश्यक आहे आणि त्या सत्यशोधनाचा परिणाम कितीही गंभीर असला तरीही त्यामध्ये कोणतीही आडकाठी येता कामा नये. मानसिक गुलामगिरीच्या वातावरणामधे काही लोक तग धरून राहू शकतील पण क्रियाशील माणसांना कधीच प्रोत्साहन मिळणार नाही. कोणतेही मत मांडायला मुभा असली पाहिजे. एखादे मत गैर अथवा चुकीचे असले तरी ते चुकीचे सिद्ध होण्यासाठी अचुक मताच्या बरोबरीने ते मांडले गेले पाहिजे, तरच ते का चुकीचे आहे हे समजेल. अन्यथा आपण कधीच तपासल्या न गेलेल्या श्रद्धासिद्धांतामधे अडकून पडू. व्यक्ती, समाज आणि विशेषतः आपल्या राजकारण्यांनी मिल यांच्या ‘ऑन लिबर्टी’चा अभ्यास करून त्यांची ही शिकवण वैयक्तिक व सामाजिक आचरणात आणली तर समाजाचे चित्र पार बदलेल.

जॉन स्टुअर्ट मिल यांनी अनेक विषयांवर आपले स्वतंत्र विचार मांडलेले आहेत. ‘ऑन लिबर्टी’ व्यतिरिक्त त्यांचे इतर महत्त्वाचे व अत्यंत गाजलेले ग्रंथ असे आहेत : सिस्टिम ऑफ लॉजिक (१८४३) याची तुलना या क्षेत्रातील ॲरिस्टॉटलच्या ग्रंथाशी केली जाते; प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (१८४८) या ग्रंथात मिल यांनी आर्थिक तत्वे सामाजिक परिस्थितीला लागू केली आहेत; कन्सिडरेशन्स ऑन रिप्रेझेन्टेटिव्ह गव्हर्नमेन्ट (१८६१); युटिलिटेरियॅनिझम (१८६३); द सब्जेक्शन ऑफ विमेन (१८६९) आणि १८७३ मध्ये मिल यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले.

उदारमतवादाप्रमाणे मिल यांनी दीड शतकापूर्वीच स्त्रीमुक्तीचा पुरस्कार केला होता. यामध्ये अर्थात त्यांची पत्नी हॅरियेट हिचा बराच प्रभाव होता. वांशिक समानतेचे समर्थन, तसेच पर्यावरण संरक्षणाबाबत कळकळीने प्रतिपादन करणे ह्याही गोष्टी मिल यांनी दीडशे वर्षांपूर्वीच उजेडात आणल्या होत्या. त्यांच्याकडे वेळीच लक्ष न देण्याचे परिणाम आपण आज भोगतो आहोत. जागतिक लोकसंख्येची वाढ, अवाढव्य शासन व्यवस्था, प्रचंड व्यापार-उद्योग आणि एका राष्ट्राची दुसऱ्या राष्ट्राच्या कारभारात लुडबूड किंवा आंतरराष्ट्रीय बाबतींमधे बळाचा वापर इत्यादींबाबतचे मिल यांनी इतक्या जुन्या काळी व्यक्त केलेले विचार आजच्या काळातही किती समर्पक आहेत हे पाहून आश्चर्य वाटते. विषय ‘शून्य विकासाचे अर्थशास्त्र’ (नो ग्रोथ इकॉनॉमिक्स) असो किंवा ‘मानववादी धर्म’ (ह्युमनिस्ट रिलिजन) असो, मिल यांनी त्याबाबत इतर विचारवंतांच्या कैक वर्षे अगोदर चिंतन केलेले आहे असे दिसते.

**– सुमन ओक**

महंमदवाडी, हडपसर, पुणे. Tel. 020-26802140.

■

## ‘आठा उत्तराची कहाणी’ प्रसिद्ध झाले

लोकशाही राज्यव्यवस्थेमध्ये एका समस्येला एकच उत्तर नसते. वेगवेगळ्या राजकीय पक्षांतील कार्यकर्ते त्यांच्या विचारधारेच्या आधारे प्रत्येक समस्येला उत्तर शोधत असतात. त्यांना बरोबर वाटणारे उत्तर ते स्वीकारतात आणि समाजात त्याप्रमाणे कृती करतात. ही मध्यवर्ती कल्पना घेऊन **प्रा. ग.प्र. प्रधान** यांनी सात राजकीय पक्षांतील (समाजवादी, साम्यवादी, गांधीवादी, फुले-आंबेडकरवादी, रॉयवादी, हिंदुत्ववादी व प्रतिसरकारवादी) कार्यकर्त्यांच्या जीवनावर आधारलेले ‘साता उत्तराची कहाणी – १९४० ते १९८० – एक राजकीय बखर’ हे पुस्तक लिहिले व मौज प्रकाशनाने ते १९८१ साली प्रसिद्ध केले. त्याची आता दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे.

या पुस्तकाचा पुढील भाग म्हणून काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट, समाजवादी आणि सर्वोदय असे पाच पक्ष आणि नक्षलवादी, रिपब्लिकन पक्ष, विविध राजकीय संघटनांतील महिला कार्यकर्त्या अशा तीन संघटनांमधील कार्यकर्ते अशा आठ कार्यकर्त्यांचे जीवन व मनोगत यावर आधारलेले पुस्तक ‘आठा उत्तराची कहाणी – १९८० ते २००७ – एक राजकीय बखर’ प्रा.प्रधान यांनी लिहिले आहे. ही राजकीय बखर मौज प्रकाशनाने १० मार्च २००९ रोजी प्रसिद्ध केली आहे.



# मायकल

राजा शिरगुप्पे

दहा वर्षांपूर्वीची गोष्ट. दादर टी. टी. स्टेशनवरून अंधेरीला चाललो होतो. दुपारची वेळ असल्याने ऐसपैस उभं राहण्याइतपत जागा मिळेल एवढी कमी गर्दी होती. मुंबईत माणूस एकतर पावसाने भिजतो किंवा घामाने. एप्रिल महिन्याच्या त्या उकाड्याने अंग घामानं चिकचिकलं होतं. लोकलच्या पंख्याखाली स्वतःला वाळवत डुगडुगत कसल्यातरी हैराण तंद्रीत उभा होतो. तेवढ्यात पाठीमागून कुणीतरी खांद्यावर हात ठेवल्याचं जाणवलं. दचकून मागे पाहिलं, तर साडेचार-पावणेपाच फूट उंचीचा, थोडासा अपऱ्या नाकाचा आणि मिशीचे कल्ले खाली वळवलेला, लालभडक टी शर्ट आणि निळ्या रंगाची विटकी वाटणारी जीन घातलेला माझ्याच वयाचा एक मनुष्य माझ्याकडे पहात स्मित करत होता. ''राजू शिरगुप्पे ना तू?'' त्यानं हसत हसत एकदमच मला प्रश्न केला आणि मी धाडकन् तीस-चाळीस वर्षे भूतकाळात मागे ढकलला गेलो. माझ्या लहानपणी म्हणजे माध्यमिक शाळेत असेपर्यंतच मला माझे घरचे आणि मित्रमंडळी 'राजू' म्हणून संबोधायचे. पुढे कथा-कविता लिहायचा धाडसी उपद्व्याप सुरू केला तेव्हा जरा भारदस्त वाटावं म्हणून 'राजा' झालो आणि आता टक्कल, पिकलेल्या दाढीमुळे आपसुकच 'राजाभाऊ'. हा समोरचा बुटबैंगण मला राजू म्हणून हाक मारतोय, म्हणजे माझ्या बालपणाचाच याच्याशी काहीतरी संबंध असणार अशी मी अटकळ बांधत माझ्या स्मरणशक्तीला ताणू लागलो. माझं गोंधळलेपण हेरत तो आपल्या नकट्या चेहऱ्यावर रुंद हास्य पसरवत पुन्हा एकदा म्हणाला, ''राजूच ना तू?'' मी अभावितपणे होकारार्थी मान डोलावली. तसा आणखी मोठ्याने हसत म्हणाला, ''ओळखलं नाहीस मला, अरे मी मायकल. मायकल डिसोझा, मिशन हॉस्पिटलमधला.''

''मायकल?'' माझ्या मनात आणि तोंडात एकदमच आश्चर्य उमटलं. झरझर स्मरणातला सगळा मधला काळ विरला आणि थेट कोंकणातल्या समुद्रकाठच्या वेंगुर्ल्यातल्या मिशन हायस्कूलच्या पाचवीच्या वर्गात जाऊन बसलो. मायकल, माझा पाचवीपासूनचा बालमित्र. शालेय अभ्यासात मी त्याचा मार्गदर्शक होतो, तर शाळेबाहेरचं जग मला समजावून देणारा तो माझा गुरूच होता. मी पटकन् त्याचा खांदा एका हातानं गच्च पकडून आवेगानं विचारलं. ''मायकल... तू? किती वर्षांनी भेटतोय आपण. मी तर तू नाव सांगितलं नसतंस तर अजिबातच ओळखू शकलो नसतो तुला. तू कसं काय ओळखलंस मला?'' त्यानं एवढ्या वर्षांनी माझ्यात बालपणाच्या काहीच खुणा उरल्या नसताना मला ओळखलं याचंच मला अप्रूप वाटत होतं. मायकलनं आपल्या डाव्या हाताची करंगळी आपल्या नकट्या नाकाच्या शेंड्यावर घासली. मला आठवलं, अगदी लहानपणापासून त्याला ही सवय होती. मग स्मित करत म्हणाला, ''तुझी तंद्री लावून उभं रहायची सवय अजून तशीच आहे.''

मी खळखळून हसलो. म्हणजे आम्ही नक्कीच जिवलग बालमित्र होतो. खरं तर मायकलला अजून पुढेच जायचं होतं, पण तीस वर्षांपूर्वीच्या बालपणाला कुरवाळण्यासाठी तो अट्टहासानं अंधेरी स्टेशनवरच माझ्याबरोबर उतरला. स्टेशनसमोरच्या रस्त्याला ओलांडून पायऱ्या चढत एका हॉटेलात शिरलो. कोपऱ्यातली निवांत जागा शोधून समोरासमोर बसलो. जवळ आलेल्या वेटरला मायकलनेच काहीबाही ऑर्डर दिली. पण आम्ही दोघेही आमचे वेंगुर्ल्यातले दिवस आळवायला अधीर झालो होतो, एवढं बरीक निश्चित!

''मायकल, पाय कशे हत रे?'' कित्येक वर्षांनंतरही मी सहज मालवणी बोलून गेलो.

''तुया वेंगुर्ला सोडलंस, ते वक्ताचे आसपास पाय वारलो.'' रेडिओवर बातमी सांगावी, इतक्या अलिप्तपणे मायकलचं उत्तर. मीच थोडासा अस्वस्थ झालो. मायकलचे वडील मिशन हॉस्पिटलच्या कँटीनमध्ये आचारी होते. मायकलची माय हॉस्पिटलमध्येच आया म्हणून काम करायची. मायकल एकुलता एक आणि आशामा, ऑलिव्हा, मेरी या तीन थोरल्या बहिणी. चौघांचही शालेय शिक्षणच चाललं होतं. मी मिशनच्या हायस्कूलमध्येच इयत्ता पाचवीत शिकत होतो आणि मायकलही माझ्याच वर्गात होता. मायकलच्या आईवडिलांचं उत्पन्न फारसं नसावं, कारण खूपच ओढग्रस्तीत त्या साऱ्यांचं जगणं चाललेलं दिसत होतं. पण आपल्या साऱ्या मुलांनी खूप शिकावं यासाठी त्यांचा चाललेला आटापिटा जाणवत होता. त्या छोट्याशा गावातल्या आणि तालुक्यातल्या एकमेव महाविद्यालयात शिकवणाऱ्या गुरुजींचा मी सभ्य मुलगा (कदाचित माझ्या मध्यमवर्गीय शामळूपणालाच सभ्यपणा समजला जात असावा) आणि वर्गात वासरात लंगडी गाय या न्यायानं दिसून येणारी माझी निरुपद्रवी हुषारी. या कारणाने मायकलनं नेहमी माझ्याच दोस्तीत राहावं असं माय, पाय आणि त्याच्या तिन्ही मानांना (बहिणींना) मनापासून वाटत असावं. त्यामुळेच मी त्याच्याबरोबर त्याच्या घरी गेलो, की कँटीनमधले पदार्थ खाऊ

घालून माझं खूपच कोडकौतुक व्हायचं. हॉस्पिटलच्याच आवारात एका बाजूला पत्रे लावून कामगारांसाठी उभ्या केलेल्या एका चाळीत दोन टीचभर खोल्यांच्या जागेत मायकलचा सारा परिवार राहायचा. कँटीनमध्येच तयार होणारे जेवण जेवायचे आणि शाळेच्या वेळेव्यतिरिक्त हॉस्पिटलच्या आवारात किंवा समोर चर्चच्या पिछाडीच्या स्मशानभूमीत अभ्यास आणि खेळ चालायचा.

''सगळ्या मानांची लग्न झाली असतील नाही?'' कुठून तरी बोलायला सुरुवात करायला हवी म्हणून माझा प्रश्न.

''दोघींचं... ऑलिव्हा आणि मेरीचं झालं. इथं मुंबईतच असतात त्या. दोघींचेही नवरे कुठे कुठे रोजंदारीवर कामाला जातात. ठीक चाललंय त्यांचं.''

''आणि आशामा माना? तीच सर्वांत थोरली ना? मला आठवलं, आशामा शिक्षण सोडून वडिलांना कँटीनच्या त्या धुरानं भरलेल्या काळ्याभोर भिंतींच्या भटारखान्यात स्वयंपाक करायला मदत करायची.''

''पायच्या मागेच वर्षभरात ती वारली. फुफ्फुसाच्या विकारानं. पायही त्यामुळेच वारला.''

भटारखान्यात कोंडून राहिलेला तो धूर याक्षणी मला एकदम आठवून घुसमटल्यासारखं झालं. मायकल किती तटस्थपणे हे सांगतोय! मला करली नीट खाता यावा म्हणून त्यातील काटे अलगद सोडवून देणाऱ्या आशामा मानाच्या अनपेक्षित आणि अकल्पित बातमीनं मी मात्र गलबलून गेलो.

''राजू, तुला जॉन आठवतो?'' मायकलच्या या अचानक प्रश्नानं मला एकदम डॉक्टर स्टिव्हन्स, मिशन हॉस्पिटलचे अमेरिकन प्रमुख आठवले. उंच, गोरेपान. येशू ख्रिस्ताच्या डोळ्यांमधलं कारुण्य डॉक्टरांच्या डोळ्यांतही तसंच भरून. येशू ख्रिस्ताच्या मानव सेवेचं तत्त्व नसानसात भिनलेले. एका रूग्णाच्या घशात अडकलेला कफ स्वतःच्या तोंडाने खेचून काढणारे. परिसरातील सर्व जनतेला ते देवदूतच वाटायचे. त्यांचा आमच्या वयाचा मुलगा जॉन. तो शिकत होता इंग्रजी माध्यमात. पण आमच्यात राहून छान मालवणी बोलायचा. शाळेपेक्षा गावाजवळच्या डोंगरातून, जंगलातून, शेतवाडीतून, आंब्याच्या-काजूच्या बागांतून भटकण्यात, ओहोळाच्या खळाळत्या पाण्यात आंघोळण्यात, मासे पकडण्यातच आमचा तिघांचा जीव जास्त रमायचा. त्यासाठी दुपारनंतर शाळेला बुट्टी मारण्याचा 'गुन्हा'ही आम्ही कैकदा करायचो. त्यासाठी शिक्षाही भोगल्या. आमच्यातलं नैसर्गिकपण मारून आम्हांला त्यांच्या कृत्रिम संस्कृतीचे आदर्श पाईक बनवण्यासाठी त्या आवश्यकही होत्या. या शाळेबाहेरच्या शाळेत मायकल आम्हा दोघांचाही पिंजराबंद सुखवस्तू मध्यमवर्गीय पुस्तकी पोरांचा नैसर्गिक गुरू होता. त्याच्याबरोबर आम्ही डोंगरातून करवंदीच्या जाळ्यांतून स्वतःला ओरबाडून घेत टच्च काळी पण गोड करवंदे खात भटकायचो. वाटेत भेटणारी भली उंच वारुळं बघायचो. त्यांची टोकं मोडून आतली मुंग्यांची वसाहत न्याहाळायला मायकलनंच शिकवलं. ज्या वारुळावर मुंगी दिसत नाही, त्या 'आयत्या बिळावर' नागोबा असतात हे मायकलनंच समजावलं. नंतर जेव्हा जेव्हा ही म्हण वापरायची वेळ आली तेव्हा या आयत्या बिळामागचं मुंग्यांचं कष्ट आठवण्याचं शाळेत न कळलेलं साक्षात्कारी तत्त्वही मायकल गुरूजींचीच देण होती, हे आता कळतंय. फांद्यांवर बसणारे पक्षी, खोडाला चिकटलेले पक्षी, जमिनीवर टुणटुण उडणारे पक्षी असे पक्ष्यांचे विविध प्रकार. 'पक्षी म्हणजे चोच असलेला दोन पंखांचा उडू शकणारा जीव' या आमच्या ज्ञानाला विस्तारित करणाराच धडा होता. शेतजमिनीत इंचभर खोलीचा अगदी बारीक मातीचा खड्डा करून कुणी सावज घसरून थेट तळाशी येईल या आशेने दबा धरून बसलेला पाऊस किंवा मोरकिडा त्यानेच आम्हाला दाखवला. आम्ही एक लहानशी काडी घेऊन त्या मोरकिड्याच्या खड्ड्यातून फिरवत ''मोरा मोरा मुंबईची वाट'' असा मुंबई कुठल्या दिशेला आहे हे धड माहीत नसताना मुंबईचं आमिष दाखवत तो किडा खड्ड्यातून बाहेर काढून मातीने भरलेल्या काडीपेटीत कैद करायचो. ओहोळाच्या तळाशी 'डेमका' नावाचा पाणबुडीसारखा फिरणारा मासा पकडायचं कसब मायकल तळमळीनं शिकवायचा, पण पाण्यात धप्पकन् पडून तळ गाठण्याव्यतिरिक्त आम्ही दोन्ही शिष्य त्यात काही प्रगती करू शकलो नाही. काजूच्या बागेतून हिंडताना काजूची फळं खाऊन बी मात्र झाडाच्या आळ्यातच टाकायचं, जर चुकून घरी नेलं तर बीतून साप येतो अशी भीतिदायक ताकीदही न विसरता तो द्यायचा. या ताकदीची दहशत आम्हाला काही काळ तरी इतकी होती की गावातून फिरताना कुणा घराच्या अंगणातून रचलेल्या काजूबींचा ढीग दिसला की तो सापांचाच ढीग वाटून धडकी भरायची. आंब्याच्या बागेतून फिरताना मात्र मायकलचं एक निसर्गदत्त कौशल्य आमच्या मनात ठसून राहायचं, ते म्हणजे त्याचा अचूक नेम. कितीही उंचावर आणि कितीही फांदोऱ्यात दडलेला आंबा वा कैरी असो, मायकलचा दगड ते घेऊनच खाली यायचा. एका दगडाच्या फेकीत चिंचांचा, आवळ्यांचा, जांभळांचा सडा पसरावा तर मायकलनंच. आम्ही मात्र मायकलच्या या कौशल्याच्या जिवावर रानमेव्यावर भरपेट ताव मारायचो. मायकलची नेमबाजी बहरात यायची ती गोट्या खेळताना आणि आबाधुबी खेळताना. आबाधुबी खेळताना मायकलचा नेम एकदा जरी चुकवता आला तरी खेळणाऱ्या प्रत्येकाला एव्हरेस्ट जिंकल्याचा आनंद व्हायचा. मायकलने 'शूटिंग'मध्ये करिअर केलं तर तो देशाला ऑलिंपिकमध्ये नक्कीच सुवर्णपदक मिळवून देईल, असे आम्हालाच काय, आमच्या शाळेतल्या शिक्षकवर्गालाही त्याचा खेळ पाहताना वाटायचं. पण वर्गात मात्र हाच मायकल या शिक्षकवर्गाला एकदम मठ्ठ वाटायचा. दगड फोडायच्या योग्यतेचाही वाटायचा नाही, हे विशेष.

एकदा शाळेच्या मैदानावर आम्ही कसला तरी खेळ खेळत होतो, बहुधा क्रिकेटच. आकाशात एक छोटीशी घार घिरट्या घालत होती. आम्हा मुलांच्या मनात काय आलं कुणास ठाऊक? मायकलच्या हातात चेंडू होता. आम्ही मायकलला डिवचलं, ''बघूया तुझा नेम. त्या घारीला मारून दाखव.'' मायकलनंही

कसलाच विचार न करता क्षणार्धांत चेंडू फेकला. नेमकं काय होतंय हे कळायच्या आधीच ती घार जीवघेणा कलकलाट करत फडफडत्या पंखांनी मैदानावर कोसळली. काहीवेळ पंखांनी आपले शरीर इकडून-तिकडे हलवत आचके देत राहिली. मग हळूहळू शांत झाली. काहीशा बालसुलभ कुतुहलाने पण बऱ्याचशा भयचकीत, सुन्न अवस्थेत आम्ही मुलं तिचं मरण अनुभवत होतो. घार निष्प्राण झाल्यावर आम्ही मायकलकडं पाहिलं. पण मायकल तिथं नव्हता, नंतर वर्गातही नव्हता. शाळा सुटल्यावर हॉस्पिटलमधल्या त्याच्या चाळीत गेलो. कँटीनमध्ये गेलो. कुठेच नव्हता. जॉन म्हणाला, ''बहुतेक चर्चच्या ग्रेव्ह यार्डमध्ये असेल.'' दोघे मिळून चर्चकडे गेलो. चर्चच्या मागे जाण्यापूर्वी जॉन सवयीने प्रार्थनेसाठी चर्चमध्ये शिरला. पाठोपाठ मीही. समोर क्रुसावर येशूची करुणामयी मूर्ती. त्या भव्य हॉलमध्ये एक प्रचंड वेदनादायी पण अंगावर येणारी शांतता भरून राहिलेली. अचानक त्या शांततेलाही थरथरवणारं एक मुसमुसणं कानावर आलं. आम्ही दोघेही दचकलो. कन्फेशन बॉक्ससमोर बेंचवर मायकलच मुसमुसत होता. आम्ही जवळ गेलो. जॉनने त्याच्या पाठीवर हात ठेवला. मायकलनं वळून आमच्याकडं पाहिलं. हाताच्या बाहीनं डोळे पुसले आणि मग काहीच न बोलता चर्चबाहेर निघून गेला.

माझ्या डोळ्यांसमोर तो प्रसंग जसाच्या तसा या क्षणी उभा राहिला.

''आता कुठं असतो रे जॉन? आणि काय करतो तो?'' आमच्या मौन संवादाला मी आवाज दिला.

''डॉक्टर आणि पाळक झाला होता. ओरिसात कुठेतरी आदिवासी इलाक्यात मिशनमध्येच काम करत होता. बजरंग दलवाल्यांनी मारलं त्याला.'' मायकलचं थंड आवाजात उत्तर. अशुभ वेळ किंवा दिवस यावर माझा विश्वास नाही, पण मायकलच्या या भेटीत मी हे सगळं अशुभच का ऐकतोय?

''मायकल, तुझी नेमबाजी काय म्हणते? खरं तर आतापर्यंत तुझं नाव ऑलिंपिक वीर म्हणून कानावर यायला हवं होतं.'' मी मलाच आलेला ताण सैलावण्यासाठी म्हणालो.

''मायकल डोळे बारीक करीत हसला. आपल्या धुरकट डोळ्यांनी माझ्याकडे पाहत म्हणाला, ''मी अभ्यासात फारसा चांगला नव्हतोच तुला माहितीय! पाय वारल्यावर मायच्या पैशात काही भागेना, म्हणून शाळा सोडून कामधंद्यासाठी मुंबईत आलो. रात्र शाळेतून पुढे शिकता येईल असंही वाटत होतं. गॅरेजमध्ये, हॉटेलमध्ये, किराणा दुकानात, जिथं मिळेल तिथं काम केलं. कचरा वेचला, भंगार गोळा करून विकलं, दिवसभर कामानं जीव थकून जायचा, मग शाळेची उमेद राहायची नाही. बांद्ऱ्याच्या झोपडपट्टीत एका टपरीत माय आणि बहिणींसह राहायचो. माय तिथंच टी.बी.नं मेली. एका बिहाऱ्यानं टॅक्सी चालवायला शिकवली. शिकलो. चालवता चालवता स्वतःची टॅक्सी केली. धंदा जमला, एकाच्या दोन टॅक्शा झाल्या. विरारला एक फ्लॅटही घेतलाय. बायको हाऊस वाइफच आहे, बांद्ऱ्याच्या झोपडपट्टीतलीच. दोन मुलं आहेत. कॉन्व्हेंटमध्ये शिकताहेत.''

मायकलनं एका झटक्यात मी काही प्रश्न विचारायच्या आधीच आपला बायोडेटा सांगून माझं तोंड बंद केलं. मग इकडच्या तिकडच्या गप्पा मारून पुन्हा भेटायचं ठरवून उठलो. उठता उठता त्याच्याकडं पत्ता मागितला. त्यानंही एका कागदाच्या तुकड्यावर आपला पत्ता लिहून माझ्या हातात दिला. हॉटेलचं बिल त्यानं देऊ दिलं नाहीच.

हॉटेलबाहेर आलो. पायऱ्या उतरून रस्त्यावर आलो. निरोपासाठी एकमेकांचा हात हातात घेतला. त्याच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. आवाजही किंचित कातर घोगरा झाला.

''राजू...'' मायकलचा गळा अक्षरशः भरून आला होता.

''भेटू... नक्कीच.'' मी त्याच्या हातावर थोपटून पाठमोरा झालो. मलाही जाणवलं, आपल्यालाही हुंदका अनावर होतोय.

''एक मिनिट राजू...'' मला पाठीमागून मायकलचा थांबवणारा आवाज आला.

''काय मायकल?'' मी त्याच्याकडे वळत म्हणालो.

''तो पत्त्याचा कागद आण जरा इकडं...'' मला वाटलं, काहीतरी दुरुस्ती करायची असेल त्याला. मी कागद त्याच्या हातात दिला. त्यानं त्याचे फाडून बारीक बारीक तुकडे केले आणि हवेत भिरकावून दिले.

मी स्तंभितच! माझा चेहरा अस्वस्थ प्रश्नार्थक. मायकलनं माझा हात हातात घेतला, पण यावेळी त्यानं आपली नजर माझ्या नजरेला भिडवली नाही. खाली पहातच म्हणाला, ''राजू, मला माफ कर. ही आपली अखेरचीच भेट. इथून पुढे आपण भेटलो तरी एकमेकाला ओळख दाखवायची नाही. मी मघाशी खोटं बोललो तुला. मी आता तो तुझा बालपणीचा आंबे पाडणारा नेमबाज मायकल राहिलेला नाही. टॅक्सी हा माझा दाखवायचा धंदा आहे. परिस्थितीचा दोष म्हण किंवा नशिबाचा, मी आता अंडरवर्ल्डमधल्या एका गँगसाठी 'शार्पशूटर' म्हणून काम करतोय. आतापर्यंत पाच 'गेम' झालेत माझ्या हातून. तुझ्यासारख्या साध्यासरळ माणसाची माझ्याशी ओळख असणं हेही खतरनाक आहे तुझ्यासाठी. पण राजू, खरं सांगतो, मला असला शूटर व्हायचं नव्हतं रे...''

एवढं बोलून मायकल गप्पकन् वळून चालू लागला. चालताना त्याच्या झुकलेल्या खांद्यातून त्याचा नावरता भावनावेग भळाळत होता.

मी सुन्न की भिन्न, मला काहीच कळत नव्हतं. आपल्या हातून घार मेली म्हणून चर्चमध्ये पश्चात्तापाने रडणारा तेव्हाचा बाल मायकल खरा की माणसं मारण्याची सुपारी घेणारा आताचा प्रौढ मायकल? माझ्या मेंदूत एक पोकळीच निर्माण झाली, आणि त्यात मी अंतराळी भिरभिरलो. समोर मायकलनं टरकावलेल्या पत्त्याच्या कागदाचे काही कपटे हवेत गिरक्या घेत होते...

**– राजा शिरगुप्पे**
'मीरालय' शिवकॉलनी, आजरा.
मु.पो. आजरा, जि. कोल्हापूर ४१६५०५.
Mob. 9423287320, Tel. (R) 02323-246482.
rajashirguppe4@gmail.com



**माधव गाडगीळ**



**बहरू दे वनराजी : ६**

# उष:काल होता होता काळरात्र आली!

इंग्रजांच्या जमान्यात शेतसारा हे सरकारचे महत्त्वाचे उत्पन्न होते. ते शक्य तेवढ्या कमी खर्चात शक्य तेवढे जास्त गोळा करणे ह्यावर सरकारी धोरणाचा भर होता. ह्याची सोय व्हावी म्हणून देशाच्या अनेक भागात इंग्रज सरकारने संस्थानिक, जहागिरदार, जमीनदार निर्माण केले होते. त्यांच्या क्षेत्रातले शेतकरी त्यांची कुळे होती, त्यांच्याकडून वर्षाला शेती उत्पन्नातला मोठा हिस्सा घेऊन, इंग्रज सरकारला काही ठराविक शेतसारा भरणे ही त्यांची जबाबदारी होती. देशाच्या सुमारे ११% क्षेत्रात असे खाजगी जमीनदारी मालकीचे जंगल होते असा एक अंदाज आहे. यातले अनेक जमीनदार, राजे-महाराजे, शिकारीचे मोठे शौकीन होते. यांच्यातील म्हैसूरचे महाराज १९५२ साली भारताच्या पहिल्या वन्यजीव मंडळाचे अध्यक्ष बनले. भारतातील पर्यावरणवादावर ह्या वर्गाचा मोठा प्रभाव आजपर्यंत टिकून आहे.

समाजवादाच्या गप्पा मारणाऱ्या सरकारला प्रचंड जमीनदारी खालसा करून कसणाऱ्याला जमीनमालक बनवणे आवश्यक होते, खाजगी जंगले सरकारच्या ताब्यात घेऊन वनविभागाच्या मालमत्तेत भर घालण्याची जरूरी होती. पण हे जमीनदार सत्ताधारी वर्गाचा एक घटक होते. तेव्हा हे परिवर्तन खंबीरपणे करणे शक्यच नव्हते. ही सारी कारवाई ढिलेपणे, जमीनदारांचा शक्य तेवढा फायदा होऊ देत व त्याबरोबरच या फायद्यातला काही हिस्सा खिशात घालत होईल हे अटळ होते. याची सुरुवात झाली १९५०च्या दशकातील जमीनदारी खालसा करण्याच्या कायद्यातून. वनखात्याच्या हातात होते त्याच्या साधारण निम्मा हिस्सा हे खाजगी जंगल त्या खात्याकडे सोपवण्याची प्रक्रिया सुरू झाली. ह्यातील मोठा हिस्सा उत्तम स्थितीत होता, त्याचे संरक्षण पर्यावरणाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते, पण घट्टपणे, तातडीने काहीही केले गेले नाही. या जंगलाची पाहणी करून त्यांचे हस्तांतरण होण्याचे काम वर्षानुवर्षे नव्हे, अक्षरश: दशकानुदशके रेंगाळत राहिले. या काळात जमीनदारांनी यातील बहुतेक जंगल जमीनदोस्त केले. स्वातंत्र्याचा उष:काल झाल्यावर लवकरच भारतभूतल्या मोठ्या वनप्रदेशावर अशी काळरात्र उगवली. नेत्यांच्या-नोकरशाहीच्या दिरंगाईतून, भ्रष्टाचारातून.

**वनाधारित उद्योग**

आधुनिक भारताच्या औद्योगिक विकासासाठी जी काय किंमत मोजावी लागणार ती मुकाट्याने चुकवलीच पाहिजे अशी मनोधारणा स्वातंत्र्यानंतर पहिली एक पिढी उलटेपर्यंत १९७२-७३ पर्यंत पाय घट्ट रोवून होती. या काळात इतर उद्योगांबरोबरच वनाधारित उद्योगही मोठ्या प्रमाणात उभारले गेले. यात होत्या कागद, प्लायवुड गिरण्या, त्यातली एक कारवार जिल्ह्यातील दांडेलीला खोलली गेली. तिने आपल्या पोटावर पाय आणले अशी कर्नाटकाच्या बुरुडांनी तक्रार केल्यावर काय झाले याची चौकशी करायला मला सांगण्यात आले, तेव्हा समजलेली नमुनेदार कहाणी भारतातल्या जंगलांचा कसा विध्वंस होत होता हे दाखवून देते.

ही गिरणी १९५८ साली सुरू करताना कारवार जिल्ह्यात भरपूर बांबू आहे, तो या गिरणीला शाश्वत रूपे पुरेल असे सांगण्यात आले. पण हा बांबू पहिल्या दशकातच खतम झाला. हे कस पाहता आढळून आले की कारखान्याच्या स्थापनेच्या वेळी बांबूच्या उपलब्धीचे भरमसाठ आकडे पुरवले होते. प्रत्यक्ष पाहणीनुसार ते दहापट फुगवलेले आढळले. याउपर गिरणीचे बांबू तोडणेही अनेकदा आत्यंतिक व नियमबाह्य होते. वर कागद गिरणीने कायदा स्वत: हातात घेऊन जंगलांना काटेरी कुंपण घालून, स्वत:चे रखवालदार ठेवून स्थानिक लोकांच्या हक्कांची पायमल्ली केली होती आणि बाजारात बांबू पंधराशे रुपये टन विकला जात असताना गिरणी सरकारला भरत होती याचा फक्त हजारावा हिस्सा-दीड रुपये टन. शिवाय गिरणीने काही नदीचे पाणी, एवढेच नव्हे तर भूजलही प्रदूषित केले होते, त्याचीही किंमत लोकांनाच द्यावी लागत होती.

एवढंच, असा फुकट मिळालेला कच्चा माल अद्वातद्वा वापरून प्रत्येक कागदगिरणीने, प्रत्येक प्लायवुडच्या गिरणीने सोन्याची अंडी देणारी कोंबडी कापण्याच्या शैलीत भराभरा खालसा केला. कागद गिरणीचे अनेक अधिकारी माझे मित्र झाले होते. मी त्यांना तुमचा कच्चा माल संपुष्टात येतो आहे याची तुम्हाला काळजी वाटत नाही का, असे विचारले. तेव्हा त्यांनी मला समजावून सांगितले; आम्ही कागद बनवण्याचा व्यवसाय करीत नाही, आम्ही मग्न आहोत पैसा कमावण्यात. कागद गिरणीच्या पहिल्या दहा वर्षातील नफ्यातून आमचा पैसा पुरा वसूल झाला आहे. आता बांबू संपला तर दुसरे पर्याय शोधू. जरूर पडली तर कागदगिरणी बंद करून पैसा मँगनीजच्या खाणीत नाही तर दुसऱ्या काही उद्योगात गुंतवू.

## पाश्चात्त्यांचे अंधानुकरण

१९५२ च्या वननीतीत वन्यजीवांच्या रक्षणाचा आवर्जून उल्लेख करण्यात आला. त्यानंतर लवकरच भारतीय वन्यजीव मंडळ स्थापन करण्यात आले. शिकारीचा शौक असलेल्या राजे-महाराजांना निश्चितच वन्यप्राण्यांची जाण होती, त्यांच्याबद्दल आस्था होती. त्यांनी या नव्या उपक्रमात पुढाकार घेतला. वर उल्लेखिल्याप्रमाणे म्हैसूरचे महाराज स्वतंत्र भारताच्या वन्यजीव मंडळाचे पहिले अध्यक्ष बनले. वन्यजीव मंडळाने व वनखात्याने वन्यजीव संरक्षणाची जी नवी चौकट बसवायला सुरुवात केली तिच्यात भारताच्या वन्यजीव संरक्षणाच्या परंपरांकडे पूर्ण दुर्लक्ष केले गेले. सारी पद्धती अमेरिकेच्या राष्ट्रीय उद्यानांच्या आदर्शावर बसवली गेली.

अमेरिकेत गोऱ्या लोकांनी प्रथम पाऊल ठेवले, तेव्हा तेथे सायबेरियातून आलेले रेड इंडियन मूलवासी निदान दहा हजार वर्षे रहात होते. त्यांची मोठमोठी माया-इन्कांसारखी राज्ये होती. साहित्य, कला, संस्कृती होती. याच्या जोडीलाच वन्य पशुपक्ष्यांचे वैपुल्य होते. अनेक निसर्गरम्य स्थळे त्यांनी सांस्कृतिक-धार्मिक श्रद्धेतून जतन करून ठेवली होती. गोऱ्यांनी बंदुकीच्या बळावर या साऱ्या संस्कृतीचा, समाजांचा, जीवसृष्टीचा नायनाट केला. माया समाजातील विद्वानांचे पुस्तक न पुस्तक हुडकून नष्ट केले, हरेक पंडितांची हत्या केली. तसेच उत्तर अमेरिकेतील कुरणांवर बागडणारे लक्षावधी बायसन-गोवंशातील पशु नष्टप्राय केले. ह्या बायसनची बेफाम शिकार करताना इतके मांस मिळायचे की त्यातील सर्वात स्वादिष्ट म्हणून केवळ जीभ खाऊन बाकीचे कलेवर तसेच कुजत टाकून दिले जायचे. हे निसर्ग व मानवी जीवनाच्या विनाशाचे युगकर्म पूर्ण होत आल्यावर, आरंभानंतर तब्बल अडीच-तीनशे वर्षांनी, वसाहतवाद्यांना विसर्ग रक्षणाच्या कल्पना सुचायला लागल्या. त्यातून यलोस्टोनसारखी राष्ट्रीय उद्याने निर्माण झाली. हे यलोस्टोन मूळ रेड इंडियनांनी जतन केलेले निसर्गरम्य स्थळ होते, जेव्हा ते राष्ट्रीय उद्यान बनवले, तेव्हा तिथल्या जिवंत राहिलेल्या उरल्यासुरल्या मूलवासियांना हाकलून देऊन ते गोऱ्या हौशी पर्यटकांच्या मनोरंजनाचे स्थळ बनवण्याची त्यांची इच्छा होती. तेव्हा त्यांनी मांडणी केली की राष्ट्रीय उद्यानात मानवाचा हस्तक्षेप मुळीच नको. मूलवासी रेड इंडियनांच्या शतकानुशतकांच्या हस्तक्षेपातूनच यलोस्टोन समृद्ध झाले होते हे सोईस्करपणे डोळ्याआड करून. ही अगदी चुकीची चौकट आपल्या लोकांना शत्रू ठरवणाऱ्या वनविभागाच्या शासनाने व त्यांच्याबरोबर वन्यजीव संरक्षणाच्या कामात सहभागी झालेल्या राजे-महाराजांनी स्वीकारली. इंग्लंड-अमेरिकेकडे डोळे लावून बसलेल्या भारतीय सुशिक्षित, शहरी, मध्यमवर्गानेही हाच आदर्श मानला. हे आहे भारतात आज प्रभावी असलेल्या लोकविन्मुख पर्यावरणवादाचे मूळ.

## शिकार कंपन्या

भल्या थोरल्या खाजगी जंगल जमिनीचे मालक असलेल्या अनेक जमीनदारांच्या, राजांच्या मालमत्तेत वन्यप्राण्यांची हेवा करण्याजोगी संपत्ती होती. अशांपैकी एक होते जुनागडच्या नवाबाचे गीरचे जंगल. इंग्रजांनी भारतावर कब्जा केला तेव्हा नर्मदेच्या उत्तरेस मोठ्या टापूत सिंह होते. त्यांच्या शिकारीचा खास शौक इंग्रजांना होता. जो जो इंग्रज राजा, ड्यूक, लॉर्ड भारतात यायचा, त्याला सिंहाची शिकार करून एक मोठे मुंडके दिवाणखान्यात लावायची हौस होती. या शिरकाणातून हळूहळू संपत येऊन १९०० सालापर्यंत सिंह फक्त गीरच्या जंगलात शिल्लक राहिले. तेही संपले असते पण अगदी १५-२० शिल्लक राहिल्यावर जुनागडच्या नवाबाने आपल्या इंग्रज सम्राटांना त्यांचा पूर्ण नायनाट झाला आहे असे खोटे सांगून ते वाचवले.

दुसरे असेच वन्यजीवांचे सुप्रसिद्ध भांडार होते राजस्थानातल्या भरतपूरच्या महाराजाच्या मालकीचे केवलादेव घनाचे सरोवर. हे उथळ सरोवर १७६३ साली एक बांध घालून शेतीला पाणी पुरवठ्यासाठी बनवले होते, पण त्या तळ्यात अक्षरश: अगणित बदके हिवाळ्यात गोळा होऊ लागली. पावसाळ्यात असंख्य करकोचे, पाणकावळे, बगळे घरटी बांधू लागले. ह्या पक्ष्यांच्याही प्रचंड शिकारी व्हायच्या. लॉर्ड लिन्लिथगो ह्या इंग्रज व्हाईसरॉयने एकट्याने १२ नोव्हेंबर १९३८ रोजी एका दिवसात तेथे ४२७३ पाणपक्षी मारले अशी फुशारकी एका खाशा शिलालेखात इथे नोंदवून ठेवलेली आहे.

स्वातंत्र्यानंतर यातील अनेक जमीनदारांनी शिकारकंपन्या स्थापल्या. वाघाच्या, बिबट्याच्या, गव्याच्या शिकारीसाठी परदेशातून पर्यटकांचा ओघ सुरू झाला. कान्हा, ताडोबा, सरिष्कासारख्या मृगयावनांतून या कंपन्यांनी प्रचंड पैसा केला. तो करताकरता वन्यजीवन संपुष्टात आले आणि मग १९७२ साली भारत सरकारने वन्यजीव संरक्षण कायदा करून ही शिकार थांबवली.

## दोषी कोण?

स्वतंत्र भारताची एक पिढी होईपर्यंत १९४७ पासून १९७२ पर्यंत असा जंगलांचा, वन्यप्राण्यांचा नाश होत राहिला. खाजगी जंगले तोडली जाऊन, धरणे-खाणींसारख्या विकासाच्या कार्यक्रमासाठी दुर्गम प्रदेशात रस्ते झाल्याबरोबर तिथे मोठी तोड होऊन आणि वनाधारित उद्योगांना जवळजवळ फुकटात माल देऊन, आणि त्याउप्पर अंदाधुंद तोड करायला मोकळीक देऊन. ही सारी सत्ताधारी वर्गांची करामत होती, ह्यात वननिवासीयांची भूमिका नगण्य होती. पण सतत या लोकांकडे बोट दाखवले जात होते.

भारतीय वनकायद्यात ग्रामवनांची तरतूद पहिल्यापासूनच आहे. पण ह्याचा फारसा फायदा करून दिला गेलेला नाही. या कायद्याअंतर्गत कारवार जिल्ह्यात तीन गावांनी- मुरूर-कल्लबे, हळकार आणि चित्रगी आपल्या परंपरागत ग्रामवनांचे चांगले रक्षण केले होते. आधी हा भाग मुंबई इलाख्यात होता, भाषावार राज्यपुनर्रचनेनंतर तो कर्नाटकात आल्यावर वनविभागाने ताबडतोब ही ग्रामवन व्यवस्था आता खालसा केली आहे असे फर्मान काढले. हे फर्मान निघताच काही आठवड्यातच चित्रगीच्या ग्रामस्थांनी आपले ग्रामवन भुईसपाट केले. हळकारच्या लोकांनी न्यायालयात धाव घेतली. तब्बल २८ वर्षांनी न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिला. आजपावेतो हळकारचे ग्रामस्थ त्यांच्या ग्रामवनाचे उत्तम व्यवस्थापन करीत आहेत; मुरूरचे ग्रामवनही बऱ्यापैकी टिकून आहे.

१९५८ साली उत्पादनाला सुरुवात केलेल्या दांडेलीच्या कागदगिरणीने १९७३ पर्यंत जिल्ह्यातला बांबू जो त्यांना अनंत कालपर्यंत पुरेल असे तथाकथित शास्त्रीय वानिकीचे आश्वासन होते– संपवला होता. गिरणीवाले हळूहळू लांबलांब जाऊन तिथलाही बांबू खतम करीत होते. ह्यातून बांबूवर उदरनिर्वाह करणाऱ्या हजारो कुटुंबांवर आकाश कोसळले होते. त्यांनी जाऊन कर्नाटकाच्या अर्थमंत्र्यांना घेराव घातला आणि त्यातून मला या बांबूच्या कर्नाटकातल्या व्यवस्थापनाचा अभ्यास करायला सांगण्यात आले. मी या परिस्थितीबाबत वनाधिकाऱ्यांशी, कागद गिरण्यांच्या व्यवस्थापकांशी चर्चा केली. सर्वांनी सांगितले की बांबू झपाट्याने कमी झाला आहे हे नक्की, पण त्याचे एकमेव कारण आहे ग्रामवासीयांचे बांबू तोडणे आणि गायी–म्हशी चारणे.

मी व नरेंद्र प्रसादने चार वर्षे कर्नाटकातील बांबूच्या जीवनक्रमाचा पद्धतशीर अभ्यास केला. बांबूचे कोंब मोठे रुचकर असतात. ते जसे वाढतात तशा बांबूंना आडव्या, काटेरी फांद्या येतात. त्यांचे एक जाळेच जाळे बांबूच्या बेटांच्या बुडाशी बनते. कागदाच्या गिरणीला प्रत्येक बेटातून जास्तीत जास्त बांबू हवा होता. तेव्हा बुंध्याजवळचे हे काटेरी आवरण त्यांना अडचणीचे वाटत होते. शिवाय या गुंतागुंतीने नव्या बांबूंची नीट वाढ होत नाही असा त्यांचा ग्रह होता. तेव्हा दांडेलीच्या गिरणीचे मजूर मुद्दाम हे आवरण साफ करायचे. उलट गावकरी काटेरी आवरण शाबूत ठेवून कमरेच्या उंचीवरच बांबू तोडायचे. लोकांना माहीत होते की या काटेरी आवरणामुळे नवे कोंब सुरक्षित राहतात. नाही तर सायाळ, वानरे, रानडुकरे, गायी–म्हशी त्यांना केव्हाच फस्त करतात. कागद गिरण्यांच्या हस्तक्षेपामुळे हेच होत होते. सगळ्या बांबूच्या बेटात नवे आलेले कोंब नष्ट होत होते आणि त्यांची वाढ खुंटलेली होती. काही वर्षांत ही बांबूची बेटे वाळून जात होती. उलट जिथे गावकरी आपल्या पद्धतीने बांबू वापरत होते, सांभाळून होते, तिथे बांबू सुस्थितीत होता. ह्याशिवाय कागदगिरणीचे कामगार अगदी बेशिस्त बांबू तोडून तो नासत होते हे वेगळेच. वनअधिकारी, कागद गिरणीचे तज्ज्ञ या साऱ्यांच्या सहकार्याने केलेल्या अभ्यासाचा स्पष्ट निष्कर्ष निघाला की गावकरी नाहीत, गिरणीच बांबूच्या विध्वंसाला जबाबदार होती.

---

**– माधव गाडगीळ**

ए–१८, स्प्रिंगफ्लॉवर्स, पंचवटी, पाषाण, पुणे ४११००८.
E-mail : madhav.gadgil@gmail.com
Mob. : 9881153413.

## दुसरे साधना साहित्य संमेलन : डिसेंबर २००९

## प्रारंभीचे निवेदन

पहिले साधना साहित्य संमेलन डिसेंबर २००८ मध्ये पुणे येथे उत्तम प्रकारे पार पडले. 'कादंबरी' या एकाच वाङ्मय प्रकाराला वाहिलेल्या या अभिनव संमेलनाचे महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात चांगले स्वागतही झाले. या संमेलनाच्या वेळीचा महाराष्ट्र व गोवा येथील काही प्रतिनिधींनी आपापल्या जिल्ह्यात असे संमेलन भरविण्याची इच्छा प्रकट केली. साधना साहित्य संमेलनाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे नियोजन भरपूर आधी केले जाते व त्यानंतर संपूर्ण वर्षभर त्यानिमित्ताने त्या विभागात काही साहित्यिक उपक्रम आवर्जून राबवले जातात. हे सर्व लक्षात घेऊन, या वर्षीचे साहित्य संमेलन व वाङ्मयप्रकार याचा निर्णय मार्च २००९ मध्ये घेण्यात येणार आहे. ज्या संस्थांना या स्वरूपाचा संयोजनात रूची असेल. त्यांनी आपल्या संस्थेमार्फत तसे पत्र 'संपादक साधना', ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० या पत्त्यावर पाठवावे.

पत्रात पुढील बाबींचा उल्लेख असावा.

१. संबंधित संस्था किती वर्षे अस्तित्वात आहे व कोणत्या प्रकारची कामे करते.
२. संमेलनासाठी कोणताही साहित्यप्रकार चालेल की, विशिष्ट आग्रह आहे.
३. दोन दिवसांच्या संमेलनासाठी सभागृह, निमंत्रित पाहुण्यांच्या (अंदाजे ४०) निवास, प्रवास व भोजनव्यवस्था, संमेलनाचे सर्व अनुषंगकि खर्च, ही रक्कम साधारणपणे १ ते १.५ लाख रुपये असू शकते व स्थानिक पातळीवर ती उभारावी लागेल. स्थानिक पातळीवर काही सेवा (उदा. सभागृह) नि:शुल्क मिळाल्यास हा खर्च बराच कमीही होऊ शकेल.
४. संमेलनास येणाऱ्या प्रतिनिधींनी स्वखर्चाने भोजन व निवास करावा असा पायंडा पुणे अधिवेशनाने पाडला आहे.
५. सहभागी होणारे साहित्यिक मानधनाशिवाय येतील याची जबाबदारी साधना स्वीकारेल.
६. संमेलनाच्या निमित्ताने संबंधित वाङ्मयप्रकाराबाबत जुलैपासून संबंधित गावांमध्ये विशेषत: तरुण विद्यार्थ्यांत काही उपक्रम चालू व्हावे अशी अपेक्षा राहील.
७. अन्य कोणत्याही अधिक माहितीसाठी डॉ.नरेंद्र दाभोलकर, संपादक साधना, (मोबा. : ९४२३८६६५४०) यांच्याशी संपर्क साधावा.
८. 'साधना'कडे २० मार्च २००९ पूर्वी पत्र पोहोचवावे.

**डॉ. नरेंद्र दाभोलकर** (संपादक, साधना साप्ताहिक)

## महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

१३२/ब भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ४११ ००७.

## जुनी वाहने जाहीर लिलाव नोटीस

जा.क्र.मकृप/आस्था-६/भांडार/वानि लि/ ४२५/२००९
दिनांक ३ /२/२००९

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या मालकीची खालील जुनी वाहने जाहीर लिलावाने 'जशी आहेत तशी व आहे त्या स्थितीत' लिलावाने **दिनांक ३० मार्च २००९ रोजी दुपारी १.०० वाजता** महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेच्या पुणे येथील उपरोक्त पत्त्यावरील कार्यालयाच्या आवारात विक्री करण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | वाहन प्रकार | रजिस्टर नंबर | मेक | खरेदी वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | फियाट ११८ एन ई | १) एमएच-१२ डब्ल्यु ४०४० | मे पाल प्युगोट लि. | १९९४ |
| | | २) एमएच-१२ जेअे ०६३० | | १९९८ |
| | | ३) एमएच-१२ जेअे ०६२४ | | १९९८ |

**अटी** : १) सर्व वाहनांचा लिलाव स्वतंत्रपणे पुकारला जाईल.

**शर्ती** : १) लिलाव बोलू इच्छिणाऱ्या व्यक्तीने लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु. ५०००/- (रु.पाच हजार) फक्त कृषी परिषद कार्यालयाच्या लेखा शाखेकडे जाहिर लिलावाच्या दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत रोखीने जमा करणे आवश्यक आहे.

२) लिलाव बोली रकमेच्या २५% रक्कम, लिलाव बोली मंजूर होताच रोखीने अनामत रक्कम म्हणून भरावी लागेल. उर्वरीत ७५% रक्कम १५ दिवसात जमा करुन वाहन ताब्यात घ्यावे लागेल.

३) सर्व रक्कम जमा झाल्यानंतरच वाहनांची नोंदणी व कराबाबतची कागदपत्रे देण्यात येतील. ती भांडार शाखेकडून उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव ज्याच्या नावे मंजूर होईल त्या व्यक्तीवर राहील.

४) सर्व वाहने 'जशी आहेत तशी व आहे त्या स्थितीत' विक्री केली जातील.

५) सर्व वाहने कृषी परिषद कार्यालयाच्या वरील पत्त्यावर पाहणीसाठी उपलब्ध आहेत.

६) लिलाव प्रक्रियेच्या वेळी लिलाव समितींचा निर्णय लिलावधारकांवर बंधनकारक राहील.

७) उपरोक्त पैकी कोणत्याही वाहनाचा लिलाव मंजूर अगर नामंजूर करण्याचे अधिकार मा. महासंचालक, कृषी परिषद, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

८) ज्यांची बोली मंजूर होईल त्या व्यक्तीला महाराष्ट्र व्हॅल्यु अ‍ॅडेड टॅक्स नियम, २००५ च्या तरतुदीनुसार १२.५ % विक्रीकर (व्हॅट कर) एकूण मंजूर केलेल्या किंमतीवर भरावा लागेल.

माहिमाका--पुणे-जाहि-५६६-२००८-२००९

**महासंचालक**
कृषी परिषद, पुणे

---

## महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम विभाग

पुणे ४११००१

**दूरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४**

**निविदा सूचना क्र. ५१ सन २००८-२००९**

### शुद्धीपत्र क्र. ४

कृपया या कार्यालयाची निविदा सूचना क्र.५१ सन २००८-२००९ दैनिक पुढारी पुणे, दैनिक इकॉनॉमिक टाईम्स पुणे व साप्ताहिक साधना पुणे या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेली आहे व त्यामधील अ.क्र. १च्या कामासाठी खालीलप्रमाणे दुरुस्ती वाचावी.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कोरे निविदा फॉर्म मिळण्याचा कालावधी | : | दि. १७/०३/२००९ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| २. | भरून पाठविलेल्या निविदा स्वीकारण्याचा अंतीम दिनांक व वेळ | : | दि. २१/०३/२००९ पर्यंत सकाळी १२.०० वाजेपर्यंत |
| ३. | भरून पाठविलेल्या निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | : | दि. २१/०३/२००९ रोजी दुपारी १.०० वा. (शक्य झाल्यास) |

निविदा सूचनेच्या इतर मजकुरात काहीही बदल नाही.

सदर निविदा सूचनेचे शुद्धीपत्रक क्र. ४ **www.mahapwd.com** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही /-
**कार्यकारी अभियंता,**
**पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पुणे - ४११००१.**

स्थळ प्रतीवर कार्यकारी अभियंता,
यांची सही असे.

## ब्राह्मणांनी लोकशाहीचा आदर करावा !

शनिवारवाड्याच्या देखाव्याच्या पार्श्वभूमीवर पुण्याच्या भूगाव येथे झालेल्या ब्राह्मण समाजाच्या अधिवेशनातील ठराव 'ते हि नो दिवसा: गता:' या काळाची आठवण करून देणारे वाटतात. शनिवारवाडा हे भारतात असे ठिकाण आहे की जेथे ब्राह्मणांनी धर्मसत्ता व राजसत्ता एकाच वेळी उपभोगली. ते म्हणतात की, 'ब्राह्मणांनी आपल्या बुद्धिमत्तेवर विश्वास ठेवला, पण लोकशाहीत बुद्धीचे काम फार चालत नाही. लोकशाहीत डोक्याला नव्हे तर डोक्यांना किंमत आहे! म्हणजे आताची लोकशाही बिनडोक (मूर्ख) लोकांची आहे, असेच त्यांना म्हणायचे आहे. पण लोकशाहीमुळेच कोणत्याही लोकसमुदायाला आपली संघटना बांधण्याचा, संस्कृतीचा विकास करण्याचा तसेच सरकारचा निषेध करण्याचा अधिकार मिळत आहे, त्याचा पुरेपूर उपभोग घेऊन लोकशाहीला दूषण देणे म्हणजे खालल्या घराचे वासे मोजणेच आहे. त्यांच्यासाठी आता पेशवाईसारखी हुकूमशाही कशी येणार? म्हणून त्यांनी इतरांप्रमाणे लोकशाहीने दिलेले स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाची गोड फळे गोड मानून घ्यावी. तसेच बहुतेक द्विजवराप्रमाणे त्यांचा असा समज आहे की देवाने त्यांना अधिक बुद्धी दिली आहे. हे जर खरे असते तर जगात ब्राह्मणांना खूप मागणी आली असती व सर्वच ब्राह्मण भूदेव असल्याने देववाणी संस्कृतमध्ये पारंगत झाले असते. पण हा त्यांचा गैरसमज दिसतो. 'ब्राह्मणांना संस्कृत भाषा कळत नाही व त्यांना वेदांची नावेही ठाऊक नाहीत!' असे दस्तुरखुद्द योगाचार्य रामदेवबाबा यांनीच अधिवेशनात सांगितले. शिवाय त्यांचा समज जर खरा असता तर शूद्र वर्णात डॉ.आंबेडकरांसारखे भारतरत्न निर्माणच झाले नसते. एका ठरावात त्यांनी शिवछत्रपतींचा अवमान करणाऱ्या जेम्स लेनचा व त्यांना मदत करणाऱ्यांचा निषेध केला आहे. जेम्स लेनला मदत करणारे भांडारकर इन्स्टिटय़ूटमधील बारा ब्राह्मण संचालक आहेत व ते सर्व आर.एस.एस.चे आहेत. नामोल्लेखासह त्यांचा निषेध करायला हवा होता. म्हणून त्यांचा हा ठराव तोंडदेखला आहे. साप सोडून भुई थोपटणे आहे. त्यांनी एका ठरावात 'ब्राह्मणांना आरक्षण नको' असे म्हटले आहे. हे त्यांचे औदार्य नसून व्यावहारिक मोठेपणा आहे. कारण त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या मानाने, सामाजिक, ऐतिहासिक कारणामुळे भरभूर मिळत आहे. कुळकायद्याच्या फेरविचारांची त्यांनी अपेक्षा करू नये. घड्याळाचे काटे आता उलटे फिरणार नाहीत हे त्यांनी ध्यानी घ्यावे. त्यांनी प्रचलित लोकशाही राज्यपद्धतीवर नाराज राहू नये. साने गुरुजी, एस.एम.जोशी, विनोबा भावे यांच्याप्रमाणे समाजाशी एकरूप होऊन 'मनुष्याची श्रेष्ठ-कनिष्ठता जन्माधिष्ठित नसते, जन्मत: सर्व समान असतात' असा ठराव करून ब्राह्मणेतरांचे प्रेम मिळवायला हवे होते.

**पंडितराव बंडू बारी**
**२०९, रामपेठ, जळगाव ४२५००१.**

## वारकऱ्यांनी 'भेदाभेद, अमंगळ' नाहीसा करावा !

२१ फेब्रुवारीच्या 'साधना' अंकातील 'आनंद यादव यांची माघार ही तर ऐतिहासिक चूक!' हे संपादकीय वारकरी व यादव यांचे सडेतोड पंचनामा करणारे आहे. संशोधन करून व आपली प्रतिभा वापरून 'संतसूर्य तुकाराम' नामक चरित्रात्मक कादंबरी (वारकरी संप्रदायातील एका गटाने विरोध केल्यामुळे) डॉ.यादव यांनी मागे घेऊन संबंधितांची माफी मागितली. या कृतीमुळे डॉ.यादवांना एवढे संशोधन करूनही तुकोबांचा 'सत्य असत्याशी मन केली ग्वाही, मानियले नाही बहुमता' हा विचार पचवता आला नाही हे स्पष्ट झाले. त्यामुळेच संमेलनाच्या अध्यक्षपदावर राहण्याचा हक्क त्यांनी गमावला आहे, हेच अधोरेखित होते!

धार्मिक उत्सवातून प्राचीन पोथ्या-पुराणातील 'लीला' सांगणाऱ्यांनी व त्या ऐकणाऱ्यांनी तुकोबारायांच्या तरुणाईतील स्खलनशील जीवनाच्या कादंबरीत रेखाटलेल्या वर्णनावर गदारोळ उडवावा याचे आश्चर्य वाटते. ३५० वर्षांपूर्वीच समानतेची आणि बंधुभावाची शिकवण संतसूर्य तुकारामांनी 'विष्णुमय जग, वैष्णवाचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ' या अभंगातून दिली. पण आजही समाजातील एका समूहाला गावकुसाबाहेर पशूचे जीवन जगावे लागत आहे आणि त्या समूहावर गावागावात अत्याचार होत आहेत. तेव्हा सत्य काय असत्य काय, ह्याचा पडताळा न करता कुणीतरी भडकवले म्हणून सदर कादंबरीच्या विरोधात जाळपोळ, बंद वगैरे करण्यात शक्ती व वेळ वाया घालवण्यापेक्षा माणसामाणसातील 'अमंगळ भेदाभेद' नाहीसे करण्याचे प्रयत्न (वरील अभंग तारस्वरात म्हणणाऱ्या व तो दुसऱ्यांना ऐकवणाऱ्या) वारकऱ्यांकडून अपेक्षित आहे.

**गोविंद काजरोळकर**
**नेहरूनगर, कुर्ला, मुंबई २४.**

## असे नवे प्रयोग पुढेही चालू ठेवा !

'डॉन' आणि 'आऊटलुक' यांच्यातून उत्तम लेखसामग्री तुम्ही अनुवादित करून छापता, तशीच सामग्री 'साधना'तून इंग्रजीत उतरण्याची व्यवस्था करायला हवी... कुठल्याही नामवंत आंतरराष्ट्रीय प्रकाशनाने अवश्य अनुवादित करून घ्यावी, अशी मोलाची लेखनसामग्री तुम्ही साधनात देत आहात याचा आनंद वाटतो. पत्रलेखकदेखील महत्त्वाची कामगिरी करीत आहेत. जास्तीत जास्त वाचकांची पत्रे छापण्याचा आग्रह वाचकच करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. २४ जानेवारीचा अंक मला नव्या वळणावरचा वाटला. त्यातील सर्वच लेख दोन-तीनदा वाचले. एवढेच नव्हे तर पुढेही वाचण्यासारखे व समजून घेण्यासारखे आहेत. तळवलकरांचा लेख तर आंतरराष्ट्रीय कक्षेचा आहे. हेरंब कुलकर्णी संपादित सहाव्या वेतन आयोगावरील पुस्तकातील उतारेदेखील सामान्य वाचकांना खूप विश्लेषक सामग्री पुरवतात. गिरीश सहस्रबुद्धे यांची पानांची सजावट, रेखाचित्रे कौतुकास्पद आहेत. असे नवे प्रयोग सतत पुढेही चालू ठेवावेत. रेणू गावस्कर यांच्या लेखातील 'नजमा'शी संवाद विलक्षण आहे. ३१ जानेवारीचा अंक वाचून तर एकदा नव्हे पुन्हापुन्हा सतत येरझारा घालत चर्चा केल्याशिवाय होतच नाही. मात्र पाचरणे, गवाणकर या नव्या लेखकांना 'प्रचारात्मकता' कमी करायला सांगावी. पानांची रचनादेखील नव्या प्रयोगाची आहे.

**गोपाळ शहा, चाणक्यपुरी, बारडोली, सुरत**

## रसभंग करणारा व 'मी'पणा मिरवणारा लेख

७ फेब्रुवारीच्या 'साधना' अंकातील 'अभिमन्यूचा धडा' हा संजय जोशी यांचा लेख वाचून अनेकांना यातना झाल्या असतील. पहिल्याच परिच्छेदात जोशींनी स्वत:ची आरती ओवाळून घेतली आहे. 'मी सहसा असे रिॲलिटी शो पाहात नाही'. मग सगळ्या जगभर लाखो लोक सोमवारी आणि मंगळवारची रात्री साडेनऊच्या वेळेची आतुरतेने वाट बघत होते ते कसे?

'आजचे आघाडीचे गायक किंवा गायिका लहान होते तेव्हा ते कसे गात असतील?' नक्कीच याच पाचजणांसारखे!

आर्या आंबेकरची लावणी, प्रथमेश लघाटेचे नाट्यगीत, रोहित राऊतचा रॉक शो, मुग्धाचे इतक्या लहान वयातील भावपूर्ण गाणे व अंतिम फेरीतील कार्तिकीचे शास्त्रीय गाण्यावर बेतलेले गीत म्हणण्याची कुवत पाहून व ऐकून थक्क व्हायला होते. परीक्षक म्हणून महादेवन, घोषाल, वाडेकरजी, शौनकजी, हृदयनाथजी, बकुळ पंडितजी, अंकलीकर या व अशा दर्जाच्या संगीताची उत्तम जाण असणाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे या सर्वांना दाद देऊन त्यांचे कौतुक केले. ते संजय जोशींपेक्षा लाखपटीने या क्षेत्रातील जाणकार आहेत म्हणून! पल्लवी जोशीचे सूत्रसंचालन, वाद्यवृंदाचे श्रवणीय संगीत, अवधूत गुप्ते व वैशाली सामंत यांचे गाण्यावरचे अभिप्राय व झी मराठीने केलेले सुरेख व नेत्रदीपक नेपथ्य या सर्वांमुळे ही संगीताची मालिका दीर्घकाळ आनंद देत राहील.

त्यामुळेच असे वाटते की, 'साधना'सारख्या साप्ताहिकात इतका रसभंग करणारा व 'मी'पणा मिरवणारा लेख छापून यायला नको होता.

**विनोद सावंत, कृष्णानगर, सातारा**

## सकारात्मक व समतोल समीक्षा करावी !

श्री. संजय जोशी यांचा 'अभिमन्यूचा धडा' हा लेख वाचनात आला. श्री.जोशी हे काही 'पॉझिटिव्ह' विचार करू शकत नाहीत काय? अवधूत गुप्ते यांनी मुग्धाला कौतुक म्हणून काही म्हटले तर त्यात 'आचरटपणा' काय? श्री.गुप्ते व वैशाली सामंत यांनी प्रत्येक अभिप्राय देताना, मुलांच्या पालकांना व शिक्षकांना 'ह्या मुलांचे बालपण हरवणार नाही ह्याची काळजी घ्या' म्हणून सांगितले आहे. श्री.जोशी हा कार्यक्रम पाहत असतील तर त्यांनी ह्याची नोंद का घेतली नाही? फक्त नकारात्मक मत का व्यक्त करावे? कोणत्याही गोष्टीची समीक्षा करावयाची तर ती सकारात्मक व समतोल असावी असे माझे मत आहे, ते चूक आहे असे मला वाटत नाही.

**मोहन बिच्चू, माहीम मुंबई.**

## दिलखुलास दाद द्या!

गोविंदराव तळवलकरांच्या जोडीला माधवराव गाडगीळ यांची लेखमाला सुरू आहे, ही आनंदाची बाब आहे. मंगेश नाबर यांनी 'साधना'तील लेखनाचा सविस्तर आढावा घेतला आहे, हे चांगले केले.

प्रदीप तत्सत यांच्या लेखातील बाजू पळशीकरांनी विचारात घेण्यासारखी आहे. यावेळी 'संजय उवाच' (अभिमन्यूचा धडा) काहीसे एकांगी झाले आहेत. 'सारेगमप'च्या उणिवा जमेला धरूनही या कार्यक्रमाने खूप मौल्यवान असे सांस्कृतिक धन गेल्या सहा महिन्यात दिले आहे, त्याला दिलखुलास दाद दिलीच पाहिजे.

**प्रा.रमेश जोशी, सावरकर मार्ग, दादर, मुंबई २८**

## ‘रिॲलिटी शोज’विषयी काही विचार...

७ फेब्रुवारीच्या अंकातील संजय भास्कर जोशी यांचा ‘अभिमन्यूचा धडा’ हा लेख उत्तम जमला आहे. ‘सारेगमप’ हा कार्यक्रम अफाट लोकप्रियता मिळवत असताना या कार्यक्रमाची अनाकर्षक, दोषी बाजू दाखवणे हे धाडसाचे होते– हे काम ज्या सडेतोडपणे जोशी यांनी त्यांच्या नेहमीच्या बिनधास्त शैलीत केले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन! वास्तवदर्शी कार्यक्रमाबद्दल (रिॲलिटी शोज) संबंधी काही विचार मला यानिमित्त मांडावेसे वाटतात.

‘वास्तवदर्शी कार्यक्रम’ हे गुणवान स्पर्धकांतून सर्वोत्तम कलाकार निवडण्याचे साधन असतात, अशी बऱ्याच लोकांची भाबडी समजूत असते. ‘कार्यक्रम उत्तम आहे, तेवढे एसएमएस वापरणे बंद करा!’ अशा अनेक प्रतिक्रिया ऐकू येतात. वस्तुस्थिती अशी आहे की अशा एसएमएसमधून येणारे उत्पन्न जास्तीत जास्त मिळवावे, हेच अशा कार्यक्रमांचे मुख्य उद्दिष्ट असते. गुणवान महागायक, महानर्तक, महाविनोदाचार्य मिळवणे हे या उद्दिष्टापर्यंत पोहोचायचे एक साधन असते. गुणवत्ता हाच निकष असता तर सामान्य दर्जाचे गायक अंतिम फेरीत व गुणवान गायक सर्वात आधी बाद असे चित्र (जे, हिंदी वास्तवदर्शी कार्यक्रमात हटकून दिसते) दिसले नसते. ‘बहुजनांचे चातुर्य’ हे गुणवत्तेबद्दल फारसे लागू होत नाही हे आपण नेहमी पाहतोच. (उदा. निवडणुकांमधून भयानक चारित्र्याचे हमखास निवडून येणारे आपले नेते!)

या पार्श्वभूमीवर ‘झी मराठी’ वाहिनीने या बालकलाकारांना साजेशी बक्षीसे देणे उचित ठरले असते. अर्थव्यवस्थेतील अशी अनेक क्षेत्रे असतात, ज्यात त्यातल्या मनुष्यबळाची गुणवत्ता हा नफा मिळवण्यासाठी सर्वात महत्त्वाचा निकष ठरतो. अशा क्षेत्रात त्यातल्या मनुष्यबळाला भरपूर (यथायोग्य नव्हे!) पगार देण्याची प्रथा असते. (उदाहरणार्थ, सॉफ्टवेअर अभियंत्याचे आभाळाला भिडलेले पगार, गुंतवणूक. बँकींगमधल्या कर्मचाऱ्यांचे अशक्यप्राय व अद्भुत वाटणारे बोनस. मेरिल लिंच या आता अस्तंगत झालेल्या गुंतवणूक बँकेच्या अध्यक्षांच्या कार्यालयातल्या संडासाची किंमत १७ लाख रुपये होती, हे उदाहरण मननीय ठरावे!)

या पार्श्वभूमीवर ‘झी मराठी’ने काय करावे? एसएमएस व जाहिरातींद्वारे कोट्यवधी रुपयांचे उत्पन्न मिळवूनही शेवटी विजेत्यांना लाखा-दोन लाखांची चिल्लर रक्कम (तीसुद्धा कुठल्यातरी कंपनीने पुरस्कृत केलेली) देण्यात आली. हा अन्याय आहे. दुय्यम दर्जाच्या हॉटेलमध्ये काम करणाऱ्या बालमजुरांना एक-दोन रुपयांची ‘टीप’ ठेवण्यासारखे!

अर्थात, या कार्यक्रमाच्या काही चांगल्या बाजूंचा उल्लेख करणे आवश्यक आहे. श्री.जोशी यांनी लिहिल्याप्रमाणे ‘सारेगमप’ने अशा वास्तवदर्शी कार्यक्रमात अपरिहार्यपणे येणारा थिल्लरपणा बराचसा टाळला. (अपवाद म्हणजे शेवटी शेवटी मराठी मालिकांमधल्या कलाकारांना संगीतावर मतप्रदर्शन करायला लावणे) हिंदी वास्तवदर्शी कार्यक्रमांत हा थिल्लरपणा बऱ्याचदा बीभत्सरसाचे रूप धारण करतो; ‘व्हॉईस ऑफ इंडिया’ या सुमार कार्यक्रमात तर गुंड ‘शान’ या निवेदकावर हल्ला करतात असे दाखविले होते, तर युवकांच्या एका वाहिनीवरच्या अशा कार्यक्रमात निवेदिका एका स्पर्धकाच्या मुस्काटीत मारते असे वास्तव दाखवले होते. (पुढे त्या स्पर्धकाने त्या निवेदकला तोंडात मारले, व नंतर त्या कार्यक्रमाच्या बॅकस्टेज कर्मचाऱ्यांनी त्या स्पर्धकाला बुकलून काढले– हे असले ढळढळीत वास्तव आपले कार्यक्रम टाळतात हे आपले अहोभाग्य!)

सरतेशेवटी एकूणच वास्तवदर्शी कार्यक्रमांच्या एका चांगल्या बाजूबद्दल लिहावेसे वाटते. कला-साहित्य खेळ- अशा काही क्षेत्रात तेथे शिखरावर असलेल्यांच्या व त्या क्षेत्रात दुय्यम फळीत असलेल्यांच्या समाजमान्यतेत, आर्थिक परिस्थितीत, उपलब्धीत कमालीचा फरक असतो. त्या क्षेत्रात प्रवेश करणाऱ्यांचा विचार केला तर हा फरक कितीतरी असतो. उदाहरणच द्यायचे झाले तर श्री.विक्रम चंद्रासारख्या असामान्य प्रतिभावान इंग्रजी कादंबरीकाराला ‘सॅकरेड गेम्स’ या कादंबरीसाठी आठ कोटींचे मानधन मिळते, तर अप्रकाशित, होतकरू लेखकाला एखादा इंग्रजी (व इंग्रज) प्रकाशक मिळणे अशक्यप्राय असते. मात्र शिखरावरील कलाकाराचे उदाहरण मनात ठेवून लाखो युवक-युवती (अनेकदा किमान गुणवत्ता असूनही) या क्षेत्रात यायचा प्रयत्न करतात व दारूणरित्या पराभूत होतात.

अशा परिस्थितीत समाजातल्या एका महत्त्वाच्या घटकात वैफल्य पसरू शकते. वास्तवदर्शी कार्यक्रमात अशा हजारो तरुणांना चमकण्याची संधी मिळते, त्यांचे वैफल्य काही काळ तरी दूर होते. ‘इंडियन आयडॉल’सारख्या टुकार कार्यक्रमांतल्या उपांत्यफेरीत पोहोचलेल्या युवकांना त्यांच्या तालुक्यातील कार्यक्रमात नुसत्या उपस्थितीचे पन्नास हजार रुपये मिळतात. (अर्थात त्यामुळे ‘सुमारांची सद्दी’ वाढते हा धोका आहेच.) आणि शेवटी अशा वास्तवदर्शी कार्यक्रमात उत्साहाने (परवडत नसूनही) एसएमएस पाठवणारी जनता! खऱ्या वास्तवात या जनतेच्या हाती कुठली निवड राहिली आहे? सर्वात महत्त्वाची निवड जिथे करायची त्या निवडणुकीत मतदानकक्षात मतदान करायला गेले की काय दिसते? एक उमेदवार लफंगा, दुसरा गुंड, तिसरा बलात्कारी, चौथा खुनी व सगळेच पैसेखाऊ. अशा परिस्थितीत धडपडणाऱ्या मेहनती व थोडीशी गुणवत्ता असलेल्या अशा या वास्तवदर्शी कार्यक्रमातल्या कलाकारांची कारकीर्द घडवण्याचे त्यांना यशस्वी बनवण्यात आपले मत कामी आले याचे समाधान फार मोठे असते. (त्यातही शक्यतो आपल्याच प्रांतातल्या व आपल्याच जातीतील कलाकाराला मत देण्याचे धोरण असते) असे समाधान हे वास्तवदर्शी कार्यक्रम लोकांना मिळवून देतात- जरी तो त्यांचा मुख्य उद्देश नसला तरी- हे विसरता येणार नाही.

**भूषण निगळे, बंगलोर, ७५.**
Mob. : 91-9886396700

# पद्मगंधाची नवी प्रकाशने

ऑटिस्टिक मुलांच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनुभवी तज्ज्ञांचे कानमंत्र देणारं हे पुस्तक ऑटिस्टिक मुलांबरोबर काम करणाऱ्यांच्या आशा पल्लवीत करतं आणि ऑटिझमबद्दलची त्यांची आंतरदृष्टी अधिक सखोल बनवतं




## स्वमग्न (ऑटिस्टिक) मुले आणि आपण सगळे

**सुमन जोशी**

**अनु. डॉ. सुशील सुर्वे**

मूल्य १०० रुपये

*'आनंदवनात इथे वेदनेवर सौंदर्याचं महावस्त्र घातलेलं आहे,*
*तुम्ही ती वेदना बघायला विसरू नका.'*

- बाबा आमटे

प्रस्तुत पुस्तकात लेखिकेने माणसाच्या आपुलकीचं, मोकळया वातारणाचं महावस्त्रही पांघरून घेतलं आहे.
आणि त्याखालच्या वेदनेलाही कवेत घेतलं आहे.

## आनंदवनी




**चंदा आठले**

मूल्य १२५ रुपये

दारिद्र्य हा त्यातील महत्त्वाचा घटक पण त्याहून अधिक महत्त्वाचा घटक
म्हणजे त्यांच्याविषयीचे जनमानसातील पूर्वग्रह




## जन्माने गुन्हेगार

**दिलीप डिसूझा**

**अनु. साधना कामत**

मूल्य १२० रुपये

**पद्मगंधा प्रकाशन**

३६/११, धन्वंतरी सह. गृहरचना संस्था, पांडुरंग कॉलनी, एरंडवन, पुणे-४११ ०३८
फोन : (०२०)२५४५५३८५, २५४४२४५५

साधना साप्ताहिक
१४ मार्च २००९

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२००९-२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून

## त्वरा करा... प्रकाशनपूर्व सवलतीत मिळवा
## १००० रुपये किंमतीचा पाच पुस्तकांचा संच फक्त ५०० रुपयांत

### १. तत्त्वप्रणाली व अंमलबजावणी
समाजवाद, साम्यवाद, फुले-आंबेडकरवाद, गांधीवाद, हिंदुत्ववाद या विविध तत्त्वप्रणाल्यांच्या अंमलबजावणीचा वेध घेणारे लेख.
**लेखक :** विनय हर्डीकर, भा. ल. भोळे, यशवंत सुमंत, गोपाळ गुरू, गो. पु. देशपांडे, स. ह. देशपांडे कुमार केतकर, गोविंद पानसरे, अशोक चौसाळकर, अजित अभ्यंकर.

### २. भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण
द्रमुक-अद्रमुक, तेलगू देसम, शिवसेना, झारखंड मुक्ती मोर्चा, बहुजन समाज पक्ष, अकाली दल, समाजवादी पार्टी, तृणमूल काँग्रेस व नॅशनल कॉन्फरन्स या प्रादेशिक पक्षांचा उगम, विकास व विस्ताराचा अभ्यासपूर्ण आढावा घेणारे लेख.
**लेखक :** राम बापट, सुहास पळशीकर, के. सी. सुरी, संध्या गोस्वामी, आशुतोष कुमार, रेखा चौधरी, ए. के. वर्मा, संजय कुमार व प्रवीण राय.

### ३. भारत आणि भारताचे शेजारी
अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांगलादेश, म्यानमार, श्रीलंका, मालदीव या भारताच्या शेजारी देशांतील राज्यव्यवस्था व समाज यांची ओळख करून देणारे लेख.
**लेखक :** प्रकाश बाळ, मनीषा टिकेकर, गोविंद तळवलकर, अशोक चौसाळकर, मेघना गुहा-ठाकूरता, लिपी घोष, सुसील सिरिवर्दना, उत्तरा सहस्रबुद्धे, अरुणा पेंडसे.

### ४. झपाटलेपण ते जाणतेपण
नाटक, चित्रपट, साहित्य, प्रशासन, आरोग्य, उद्योग, पत्रकारिता, माहिती तंत्रज्ञान व सामाजिक कार्य या क्षेत्रांतील बारा नामवंतांचे व्यक्तिगत जडण-घडण, जीवनविषयक दृष्टिकोन व सामाजिक जीवनावर भाष्य करणारे लेख.
**लेखक :** प्रतीक्षा लोणकर, राजन गवस, यमाजी मालकर, संजय भास्कर जोशी, पंकज कुरुलकर, सुभाष वारे, लक्ष्मीकांत देशमुख, अतुल कुलकर्णी, अच्युत गोडबोले, डॉ.अभिजित वैद्य, रझिया पटेल, अतीश दाभोलकर.

### ५. लेखणीचे ललित
शेक्सपीअरच्या नाटकांचे रसग्रहण करणारे सात लेख. सात स्वतंत्र व अनुवादित कथा.
**लेखक :** प्रा. ग. प्र. प्रधान

---

**पुस्तके 'साधना' कार्यालयातून घेऊन जाणार असल्यास रु. ५००/-.**
**पुस्तके पोस्टाने हवी असल्यास (५०० + १०० ट.ख.) = रु. ६००/-**
**नोंदणी रोखीने किंवा डी.डी./एम.ओ. 'साधना प्रकाशन' या नावाने पाठवून खालील ठिकाणी करावी -**

---

**: साधना साप्ताहिक :**
९२६ सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ रस्ता, पुणे ३०.
दूरध्वनी : ०२०-२४४५१७२४.
स. १० ते सायं. ५ (रविवार बंद)

**: साधना ग्रंथप्रदर्शन आणि मीडिया सेंटर :**
४३१ शनिवार पेठ, पोलिस चौकीसमोर, पुणे ३०.
दूरध्वनी : ०२०-२४४५९६३५.
स. १० ते रात्री ८ (बुधवार बंद)

**(ही सवलत योजना फक्त पहिल्या ५०० संचांसाठी आहे.)**